
## बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन    डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक २१ | बुधवार, दि.२९ एप्रिल ते ५ मे २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# प्रवेश नसतानाही नावासमोर “एनआयटीएन” दाखवितात खासगी कोचिंग क्लास




## पालकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न

**आमच्या संस्थेत जे विद्यार्थी संभाव्य एनआयटीमध्ये जाणार आहेत, त्यांचे छायाचित्र होर्डिंगवर लावण्यात आले आहे. त्यांना सध्या महाविद्यालय मिळण्यास आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये प्रवेशप्रक्रीया पूर्ण होईल. होर्डिंगवर छायाचित्र असलेल्यांची सहानिशा करण्यासाठी मी आपल्याला गुणपत्रिका देणार नाही. गरज असल्यास पालकांशी संपर्क करा. तसेच देशात २ लाखाच्या जवळपास जागा आहेत.**

**रोहित झा, संचालक कॅरिअर झोन अकादमी.**

**गोंदिया:-** कोचिंग क्लासेसची होर्डींगबाजी हा गुणवत्तापूर्ण शिक्षणाऐवजी केवळ व्यवसाय आणि नफा कमवण्याचा गोरखधंधा बनत असल्याचे आजच्या घडीला सर्वत्र दिसून येत आहे. गोंदियासारख्या शहरात तर खासगी कोंचिग क्लासेसच्या होर्डींगमुळे शहराचे विद्रुपीकरण झालेले असतांना नगरपरिषद व जिल्हाधिकारी कार्यालय आधंळे व बहिरे होऊन बसलेले आहे. सध्या गोंदिया शहरात एनआयटी (NIT) किंवा आयआयटी (IIT) च्या नावाचा वापर करून अनेक कोचिंग क्लासेस पालक व विद्यार्थ्यांची फसवणूक करत असल्याचा प्रकार समोर येत आहे.

जेईईचा नुकताच निकाल जाहिर झालेला आहे, परंतु त्यात उत्तीर्ण झालेले विद्यार्थी हे एनआयटीएन झाले असे नाही, मात्र गोंदिया शहरातील कॅरीयर एक्सझोन या खासगी कोचिंग क्लासेसच्यावतीने शहरातच नव्हे जिल्ह्यात लावलेल्या होर्डीगमध्ये ४३ विद्यार्थी एनआयटीएन झाल्याच्या उल्लेख करीत विद्यार्थ्यासह पालकांची दिशाभूल करुन आपल्या खासगी कोचिंगचा प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून आले. जेव्हा की देशपातळीवर एकुण आयआयटी,एनआयटी व ट्रिपल आयआयटीच्या ५२६२५ जागा असल्याचे पडताळणीत समोर आले.

मागच्यावर्षी सुध्दा त्यांनी अशाच प्रकारचा एक प्रकार केलेला होता, त्यात अखिल भारतीय ८२ वा रँक दाखवलेल्या मुलीला दिल्ली, भोपाल, रायबरेली सारख्या आर्युविज्ञान संस्थेत प्रवेश मिळायला हवा होता, मात्र नागपूरच्या एएम्समध्ये मिळाल्याने कुठेतरी दिशाभूल करण्याचा केविलवाणा प्रकार झालेला होता. याप्रकरणात पालकांचा व नागरिकांनी गोंधळ केल्याने शहरातील होर्डीग व सोशल मिडिया प्लेटफार्मवरुन ते सर्व हटवून पोलिसांकडे क्षमायाचना सुध्दा करण्यात आली होती.

विशेष म्हणजे शहरात जागोजागी हे होर्डीग लागलेले असून नगरपरिषदेच्यावतीने बहुतांश होर्डीगची परवानगीच घेतली नसल्याचे होर्डीगवरुन बघावयास मिळाले. एकीकडे विजेचे खांब व शासकीय मालमत्तेवर होर्डीग लावणे गुन्हा असताना कॅरीयर झोन कोचिंग क्लासेला मुख्याधिकारी व पोलिसांनी जणू परवानाच दिला की काय अशा पध्दतीने होर्डीग लावून शहराच्या विद्रुपीकरणासोबतच १० वीत असलेल्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना भ्रामक जाहिरातबाजीतून प्रभावित करण्याचे काम करण्यात येत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

**एकुण जागा ५२६२५**
**आयआयटी जागा- १८१६०**
**एनआयटी जागा- २४५२५**
**ट्रिपल आयआयटी- ९९४०**

हे क्लासेस “१००% निकाल’ किंवा “NIटियन शिक्षक’ असे खोटे दावे करून पालकांकडून मोठी फी उकळतात आणि प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची दिशाभूल करीत असल्याचे रिझल्टवरून सम जते. एनआयटीन (NIT) किंवा तत्सम स्पर्धा परीक्षांच्या कोचिंग क्लासेसमधील गोरखधंदा हा विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणारा एक मोठा व्यवसाय बनला आहे.




यामध्ये भरमसाठ फी, बनावट निकाल, हुशार विद्यार्थ्यांची जाहिरातबाजी आणि अप्रशिक्षित शिक्षकाकंडून शिक्षण यांसारख्या बाबींचा समावेश आहे. अनेक कोचिंग क्लासेस जाहिरातींमध्ये १००% निकालाचे दावे करतात. यामध्ये एकाच विद्यार्थ्याचा फोटो अनेक क्लासेसचे होर्डिंग्जवर दाखवून खोटा जनसंपर्क केला जातो.

आकर्षक बॅनर आणि होर्डिंग्ज वापरून, यशस्वी विद्यार्थ्यांचे फोटो लावून (जे अनेकदा खरे नसतात) विद्यार्थ्यांना आकर्षित करुन फसविण्याच्या प्रकारही वाढलेला आहे.अशाच एका प्रकरणात गोंदियातील कॅरीयर झोन कोचिंग संस्थेच्यावतीने शहरात ४३ विद्यार्थी एनआयटीएन झाल्याचा उल्लेख असलेले होर्डींग लावले आहे, ज्यामध्ये २७ विद्यार्थ्यांचे फोटो नाव टाकले गेलेत.

विशेष म्हणजे अभियात्रिंकी शाखेत आयआयटी प्रथम स्थान असते, त्यानंतर एनआयटी, ट्रिपल आयटीला प्रवेश मिळतो. यानंतर जे जेईई उत्तीर्ण विद्यार्थी आहेत ते अभियांत्रिकीच्या विविध शाखेत प्रवेश घेतात. मात्र एनआयटी नंतर ट्रिपल आयआयटी असल्यानंतरही होर्डीगबाजीत मात्र एनआयटीआधी ट्रिपल आयआयटी घालून पालकांची व विद्यर्थीची दिशाभूल केली जात असल्याचे दिसून येत आहे.कॅरीयर एक्सझोनच्या सोशल मिडियावर आजही असे अनेक प्रकार बघावयास मिळतात.

# देवरीच्या सेवानिवृत प्राचार्यवर संचालकावर पास्कोचा गुन्हा दाखल



**गोंदिया-** जिल्ह्यातील देवरी येथे पुन्हा काळीमा फासणारी घटना घडली.एका राजकीय पक्षासी सबंधित असलेल्या सेवानिवृत्त प्राचार्याने स्वतःच्या घरी सुरु केलेल्या वसतिगृहातील एका पंधरा वर्षीय मुलीला पत्नीच्या साडीला प्रेस मारून दे या बहाण्याने जबरस्ती हात पकडून मनाविरुध्द गैरकृत्य करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरची घटना ही २४ एप्रिल २०२६ रोजी सायकांळी ५ ते ६ वाजे दरम्यानची आहे.

विशेष म्हणजे सदर आरोपी व्यक्ती हे एका राजकीय पक्षासी संबधित असल्याने पास्को अंतर्गत गुन्हा दाखल होऊन चार दिवसापासून पोलिसांच्या हाती लागले नसल्याने अनेक चर्चांना उधाण आले आहे.

सविस्तर असे की पिडीत मुलीने दिलेल्या तक्रारीच्या आधारे देवरी पोलीस स्टेशन येथे आरोपी सेवानिवृत्त प्राचार्य काशिनाथ शहारे यांच्या विरुद्ध पॉक्सो (POCSO) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी हा गेल्या चार दिवसापासून पोलिसांच्या हाती लागलेला नाही. त्यामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर सुद्धा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

चार दिवस लोटूनही आरोपी हा अद्यापही मोकाट असल्याने पोलिसांच्या विरुद्ध नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.तसेच या प्रकरणाची माहिती प्रसारमाध्यमांना देण्याच्या बाबतीतही देवरी पोलीस ठाणे प्रमुख यांनी टाळाटाळ केली होती.सदर प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरिक्षक मुकेश राठोड हे करीत आहेत.

मागील काही दिवसांपासून स्थानिक एका वसतिगृहात संचालकांकडून आदिवासी समाजातील युवतीची छेड काढण्यात आल्याची कुजबुज सुरू होती. पीडित युवतीसह तिच्या कुटुंबियांनी जिल्हा पोलिस अधीक्षकांकडून कैफियत मांडल्यानंतर या गंभीर प्रकरणाची पोलिसांकडून दखल घेण्यात आली आहे.

सविस्तर असे की, देवरी येथे सेवानिवृत्त प्राचार्य काशीनाथ शहारे हे खाजगी वसतिगृह चालवित असून सदर वसतिगृह जवळपास २५-३० मुली राहतात.मात्र गेल्या काही दिवसांपासून एका मुलीची छेड काढण्यात आल्याची कुजबुज होती.२४ एप्रिल रोजी परत संचालकाने एका अल्पवयीन मुलीला आपल्या घरातील बेडरुममध्ये पत्नीच्या साडीला प्रेस लावून देण्याच्या बहाण्याने बोलावून विनयभंग करण्याचा प्रयत्न केल्याने पिडीत तरुणीने विरोध करीत घटनेची माहिती नातेवाईकांना दिली.त्यानंतर सदर पिडीताच्या नातेवाईंकानी २४ एप्रिल रोजीच पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली,मात्र ४ दिवसलोटूनही आरोपीला पोलीस पकडू शकले नाहीत.त्यातच सदर पिडीत तरुणीच्या मदतीला समाजसेवेचा ढिंढोरा पिटणारे त्या पिडीत तरुणीच्या समाजातील तथाकथीत नेते सुध्दा पुढे न आल्याने राजकीय दबावाला बळी पडल्याची चर्चा सुरु झाली आहे.

**तो संचालक बेपत्ता**

गेल्या काही दिवसांपासून घटनेची देवरी शहरात चर्चा जोर धरू लागली होती. त्यातच गुन्हा दाखल न झाल्यामुळे या प्रकरणाची दखल घेण्यात येणार की नाही, अशीही चर्चा सुरू होती. जिल्हा पोलिस अधीक्षकांनी प्रकरणाचे गांभिर्य लक्षात घेवून दखल घेतल्याने तो राज्यातील सत्ताधारी पक्षासोबत संबधित असलेला तो सेवानिवृत्त प्राचार्य असलेला वसतिगृह संचालक देवरी शहरातून बेपत्ता झाल्याची चर्चा जोर धरू लागली असून देवरी पोलिसांच्या कार्यक्षमेतवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

यासंदर्भात देवरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक डांगे यांना दोन दिवसापुर्वी संबधित प्रकरणावर विचारणा करण्यात आली असता आपण बंदोबस्तात व्यस्त असल्याने नंतर माहिती देतो असे सांगत माहिती देण्यास टाळाटाळ केली होती.

## उष्णतेच्या लाटेमुळे गोंदिया जिल्ह्यात शाळांच्या वेळेत बदल

**गोंदिया:-** गोंदिया जिल्ह्यात सध्या तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत असून उष्णतेच्या लाटेचा (हीट वेव्ह) परिणाम नागरिकांच्या६ आरोग्यावर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हाधिकारी हे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष असल्याने त्यांना आपत्ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, डॉ. मंगेश गोंदावले यांनी आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार, गोंदिया जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, प्राथमिक व माध्यमिक शाळांची वेळ सकाळी ०७.०० ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, खाजगी शिकवणी वर्ग (कोचिंग क्लासेस), प्रशिक्षण वर्ग, उन्हाळी शिबिरे (समर कॅम्प) व शिक्षणाशी संबंधित सर्व उपक्रम सकाळी ०७.०० ते १०.०० या वेळेत किंवा सायंकाळी ०५.०० वाजल्यानंतर घेण्यास परवानगी देण्यात आली आहे. नागरिकांनी उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

# पाच वर्षातील एसीबीच्या कारवाईत १६३ जणांपैकी दोघांना शिक्षा,१६ निर्दोष

**गोंदिया :** लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या मागील ५ वर्षाच्या कारवाईत फक्त २ प्रकरणांत न्यायालयाने शिक्षा दिली आहे. ही माहिती लाचलुचत प्रतिबंधक विभागाच्या आकडेवारीत समोर आहे.राज्य सरकारने नवा लोकायुक्त कायदा विधेयक मांडण्याची घोषणा केली. यानुसार लोकायुक्तांना भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याचे अधिकारही मिळतील. परंतु , न्यायलायिन प्रक्रिया वगळता विभागाची मागील पाच वर्षात कामगिरी समाधानकारक आकडेवारी नुसार दिसत नाही.आरटीओ अधिकारी,गटविकास अधिकारी यांच्यासह इतर महत्वाचे अधिकारी जाळ्यात अडकले गेलेत.

लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने मागील पाच वर्षात नोंदवलेल्या २०२१ ते २६ दरम्यान ६५ प्रकरणात सापळा कारवाई करण्यात आली.यामध्ये १४४ शासकीय अधिकारी कर्मचारी लोकप्रतिनिधी यांना लाचप्रकरणात ताब्यात घेण्यात आले होते.यांच्यासोबतच १९ खासगी इसमांवर कारवाई करण्यात




आलेली होती. १६३ जणांपैकी २०२१ ते २०२६ पर्यंतच्या प्रकरणात फक्त २ जणांना शिक्षा झाली असून १६ जण निर्दोष सुटले आहेत.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की राज्यभरातील विविध सरकारी विभागात ज्यांच्यावर भ्रष्टाचाराच्या गंभीर प्रकरणांमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, त्यांच्यावर अद्याप निलंबनाची कारवाई झालेली नाही.या अधिकाऱ्यांच्या यादीत ग्राम विकास खाते पहिल्या क्रमांकावर आहे.गोंदिया जिल्ह्यात लाचलुचपत विभागाच्यावतीने २०२१ सापळा कार्यवाही करुन ११ प्रकरणात १२ लोकसेवक व १ खाजगी ईसमावर कारवाई करण्यात आली.यावर्षीच्या कारवाईत फक्त १ व्यक्तीस शिक्षा झाली असून ४ व्यक्ती हे निर्दोष सुटलेले आहेत. २०२२ मध्ये १५ सापळा कार्यवाहीत १७ लोकसेवक व ३ खासगी ईसम ताब्यात घेण्यात आले होते.यावर्षी ३ जण निर्दोष सुटले आहेत.२०२३ मध्ये १२ सापळा कार्यवाहीत १६ लोकसेवक व ३ खाजगी ईसमावर कारवाई करण्यात आली,तर न्यायालयाने १ ला शिक्षा व १ निर्दोष ठरवले आहे.२०२४ मध्ये १० सापळा कार्यवाहीत १५ लोकसेवक व ६ खाजगी ईसमावर कारवाई करण्यात आली.यावर्षीच्या प्रकरणात १ व्यक्ती निर्दोष ठरविण्यात आले.२०२५ मध्ये १३ सापळा कार्यवाहीत १४ लोकसेवक व ६ खाजगी ईसमावर कारवाई करण्यात आली होती,या वर्षात ६ जणांना न्यायालयाने निर्दोष ठरवले आहे.तर २०२६ मध्ये एप्रिल महिन्यापर्यंत ४ सापळा कार्यवाहीत ५ लोकसेवकास ताब्यात घेण्यात आले असून १ जणांस निर्दोष सोडण्यात आले आहे.

### भाजयुमोच्या ३० एप्रिलपासून सर्व शाळा/महाविद्यालय तत्काळ बंद करण्याची जिल्हाधिकाऱ्यांना मागणी

**गोंदिया-**एप्रिल महिन्यातील कडक उन्हामुळे तापमानात आधीच लक्षणीय वाढ झाली आहे. गोंदिया आणि संपूर्ण विदर्भ प्रदेश उकाड्याने होरपळत आहे. उष्माघात, निर्जलीकरण आणि उष्णतेच्या लाटांच्या जीवघेण्या परिणामांमुळे लोक घराबाहेर पडणे टाळत आहेत. मात्र, आजकाल मुलांना शाळांमध्ये अजूनही उकाड्याचा सामना करावा लागत आहे. शाळांनी अद्याप उन्हाळी सुट्टी जाहीर केलेली नाही. खाजगी शाळांमध्ये अजूनही वर्ग सुरू असून, त्यामुळे मुलांना उष्माघाताचा धोका निर्माण झाला आहे.तीव्र उष्णतेची लाट आणि त्याचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता, गोंदियाचे आमदार विनोद अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाने जिल्हाधिकारी डॉ. मंगेश गोंदावले यांच्याकडे जिल्ह्यातील सर्व सरकारी आणि खाजगी शाळा/महाविद्यालये ३० एप्रिलपासून तात्काळ बंद करण्याची मागणी केली आहे.याव्यतिरिक्त, भाजयुमो जिल्हाध्यक्ष रोहित अग्रवाल यांनी आपल्या निवेदनात मागणी केली आहे की, खाजगी शाळा सध्या स्वतःचाच एक नवीन पायंडा पाडत आहेत.

# धीरेंद्र शास्त्रींच्या वक्तव्यावरून शिवप्रेमी संतप्त,ठिकठिकाणी पोलिसांत तक्रार

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेसमोर निषेध



**गोंदिया:-** कथावाचक धीरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा या कथावाचकाने महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी अत्यंत संतापजनक असे वक्तव्य नागपूर येथे आयोजित कार्यक्रमात केले. त्या वक्तव्याच्या विरोधात गोंदिया शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेसमोर आंदोलन करून धीरेंद्र शास्त्री याच्या छायाचित्राला जोडेमारून निषेध व्यक्त करण्यात आला. दरम्यान धीरेंद्र शास्त्री याच्यावर कठोरात कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज हे एकट्या महाराष्ट्राचेच नव्हे, तर संपूर्ण भारतीयांचे प्रेरणास्थान आहेत. गुलामीच्या बेड्या फेकून सर्वसामान्यांना हाताशी धरत रयतेचे राज्य निर्माण केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यात जाती, पातीला स्थान नव्हते. तर अगदी तळागाळातील व्यक्तींचा देखील त्यांनी आदर राखला. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांचे आदराचे स्थान अढळ आहे. अशा रयतेच्या राजाबद्दल धीरेंद्र शास्त्री या कथावाचकाने नागपूर येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मोहन भागवत यांच्यासमक्ष “छत्रपती शिवाजी राजे यांनी आपण आता थकले आहोत. त्यामुळे मी हे माझे स्वराज्य आणि माझे मुकूट आपल्या चरणी ठेवत आहे. त्याचे रक्षण आपण करावे, असे रामदास स्वामी यांना म्हटले होते.’ असे वादग्रस्त विधान केले. या विधानामुळे संपूर्ण महाराष्ट्रात या संताप व्यक्त करण्यात येत असून धीरेंद्र शास्त्री याचा निषेध व्यक्त करण्यात येत आहे.



सालेकसा येथे ओबीसी संघर्ष कृती समितीच्यावतीने धीरेंद्र शास्त्रीच्या विरोधात तक्रार देतांना बबलू कटरे, विजय फुंडे, शैलेष बहेकार, विमल कटरे व इतर सदस्य

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संपूर्ण आयुष्यात रामदास स्वामी यांच्याशी छत्रपती शिवाजी महाराज यांचा कधी संबंध आला नाही. असे असताना धीरेंद्र शास्त्री याने रामदास स्वामी याचे उदात्तीकरण करण्याच्या हेतूने छत्रपतींना कमी लेखण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचा आरोप शिवप्रेमींकडून करण्यात येत आहे. धीरेंद्र शास्त्री याच्या या संतापजनक वक्तव्याचा गोंदिया जिल्ह्यातील समस्त शिवप्रेमींकडून निषेध व्यक्त करण्यात येत आहे.

२६ एप्रिल रोजी शहरातील मनोहरचौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेसमोर संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ, ओबीसी संघर्ष कृती समिती, छत्रपती शिवाजी महाराज मराठा समिती, कुणबी समाज, सकल ओबीसी समाज ओबीसी अधिकार मंच, युवा बहुजन एकता मंच आणि शिवप्रेमींच्या वतीने धीरेंद्र शास्त्री याच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला. तत्काळ धीरेंद्र शास्त्री याच्यावर गुन्हा दाखल करून कारवाईची मागणी करण्यात आली. त्याचप्रकारे कॉंग्रेस कमिटीच्या सभेत देखील निषेधाचा ठराव घेण्यात आला. दरम्यान जयस्तंभ चौकात धीरेंद्र शास्त्रीच्या छायाचित्राला काळे फासून जोडे मारो आंदोलन करण्यात आले. आंदोलनात विनय मोहिते, गोल्डी गावंडे, श्रीकांत चांदुरकर, चंद्रभान तरोणे, हर्षल पवार, संदीप रहांगडाले, अमर वराडे, जितेंद्र कटरे, कमलेश नशीने, बबलू कटरे, मनोज मेंढे, सुनील तरोणे, राजीव ठकरेले, कमल हटवार, राजकुमार पटले, कैलाश भेलावे, सुनील भोंगाडे, मुकेश दहिकर, शैलेश बहेकार, सावन डोये, महेंद्र बिसेन, स्नेहल तरोणे आदींचा समावेश होता.





आमगाव येथे सकल बहुजन समाजाच्यावतीने धीरेंद्र शास्त्री विरोधात तक्रार देतांना संजय बहेकार, तिरथ येटरे, भुमेश शेंडे, पिंकेश शेंडे, देवकांत बहेकार, राजकुमार लाडसे, रितेश चुटे, मुनेश पंचेश्वर, उमाकांत उईके, धीरज ठाकरे, मुकेश उजवणे व हिमालय येडे

# *भीषण गर्मीच्या वेळेत गोंदियातील सिग्नल राहणार बंद, वाहतुक शाखेचा निर्णय*

**गोंदिया:-** जिल्ह्यात दिवसेंदिवस उन्हाचा तडाखा वाढत असून तापमानाचा पारा तब्बल ४३ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे. कडक उन्हामुळे नागरिक हैराण झाले आहेत. त्यामुळे शहर वाहतुक शाखेच्यावतीने गोंदिया शहरातील प्रमुख चौकांमध्ये लावण्यात आलेले सिग्नल दुपारी १२ ते ४ या वेळेत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.गेल्या अनेक वर्षापासून उन्हाळ्याच्या दिवसात उन्हाचे चटके बसताच पोलीस प्रशासन नागरिकांच्या मदतीला धावून येते.

गोंदियातही तापमान ४३ अंश सेल्सिअसच्या पुढे गेल आहे. उन्हात उभं राहून काम करणाऱ्या वाहतूक पोलिसांसाठी उन्हापासून बचाव करण्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय वाहतूक पोलीस निरीक्षकांनी घेतला आहे,सोबतच वाहतुक पोलिसांच्या कामकाजाच्या वेळेतही बदल करण्यात आलेला आहे.

तसे बघितल्यास शहरातील जयस्तंभ चौक व बालाघाट टि पाईट चौकातच सिग्नल सुरु असून यातील बालाघाट टि पॉईटवरील सिग्नल हे बहुतांश बंद असतात. मात्र मुख्य जयस्तंभ चौकातील सिग्नल हे नियमित सुरु असल्याने व याठिकाणी वाहतुकीची वदर्ळ अधिक असल्याने उन्हापासून



**नागरिकही शिस्त पाळत नाहीत**

**वन-वे,चुकीच्या दिशेने ये-जा करणे, झेब्रा क्रॉस पट्टयाच्या आत सिग्नलला थांबणे. हिरवा दिवा लावण्याच्या आतच वाहनचालक पुढे जातात. वाहतूक नियम पाळणे गरजेचे आहे. शॉर्टकटचा मार्ग म्हणून चुकीच्या दिशेने ये-जा करतात. वन-वे चा अवलंब होत नाही. अशा वाहनचालकांवर दंडात्मक अथवा गाडी जप्त करण्याची कारवाई केल्याशिवाय जरब बसणार नाही.**

बचाव करण्याकरीता दुपारच्या सुमारास वाहतुक सिग्नल बंद ठेवण्याचा लोकोपयोगी निर्णय घेण्यात आलेला आहे.

अनेक दिवसांपासून बंद आहेत. मुख्य चौकात, रस्त्यावर वाहतूक विस्कळीत होण्याचे प्रमाण वाढत आहे. सिग्नल बंद असले तरी पोलिस चौकात थांबतात. पण, त्यांच्याकडून मॅन्युअलव्दारे नियोजन होताना दिसत नाही.

सिग्नल बंद असले तरी मॅन्युअलव्दारे नियोजन शक्य आहे. प्रत्येक चौकात पोलिस पॉइंट आहे. त्यांनी सकाळी नऊ ते अकरा सायंकाळी पाच ते सात यावेळत मॅन्युअल नियोजन केल्यास थोडीफार शिस्त येऊ शकते. शाळा, कॉलेज, कार्यालयात ये-जा करण्यासाठी या वेळेत वाहनांची मोठी गर्दी असते. अंडर ग्राऊंड चौकात पोलिसाची गरज असताना नेमणूकच होत नाही. रिक्षातून ओहरसीट प्रवासी वाहतूक सुरूच आहे. पोलिसांसमोरच प्रवासी वाहतूक ट्रीपलसीट दुचाकीवरून तरुण जातात. त्यांच्यावर कारवाई मात्र नाही. नाकाबंदीत येनकेन कारणामुळे कारवाई केली जाते.

## संपादकीय

### उष्णतेचा कहर आणि बळीराजाची दैनावस्था

विदर्भाचे तापमान म्हणजे उन्हाळ्यात लाहीलाही होणारी जमीन, हे समीकरण नवे नाही. मात्र, एप्रिल २०२६ च्या अखेरीस पूर्व विदर्भातील गोंदिया, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये सूर्यदेवाने अक्षरशः रौद्र रूप धारण केले आहे. पारा ४६–४७ अंशांच्या उंबरठ्यावर पोहोचला असून, हवामान विभागाने मअतिउष्णतेचाफ इशारा दिला आहे. हे तापमान केवळ आकडा नसून, विदर्भातील जनजीवन विस्कळीत करणारी अग्निपरीक्षा आहे.

विदर्भात उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती कायम असून सोमवारी सलग दुसऱ्या दिवशी विदर्भात पारा ४६ अंशावर नोंदला गेला. तर मराठवाडा आणि मध्य महारष्ट्रातील काही भागात सरासरी तापमाना–हून ३ अंश अधिक कमाल तापमानाची नोंद होत आहे. यामुळे मागील काही दिवसांपासून पावसाळी हवामान असलेल्या या प्रदेशात नागरिकांना उन्हाची काहिली सहन करावी लागत आहे. दरम्यान, पुढील पाच दिवसात राज्यातील कमाल तापमानात २ ते ३ अंशांनी घट होईल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

राज्यात मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यातील कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली असून कोकण प्रदेशात काही जिल्ह्यांमध्ये उष्ण आणि दमट वातावरण कायम असल्याने उन्हाचा तडाखा नागरिकांना सहन करावा लागत आहे. विदर्भातील अमरावती येथे सोमवारी राज्यातील सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद झाली. येथे ४६.६ अंश सेल्सिअस नोंदले गेले. तर रविवारी अमरावती येथे एप्रिल महिन्यातील आतपर्यंतचे सर्वाधिक कमाल तापमान नोंदले गेले होते. तर अकोला ४६.३, वर्धा ४६.५, चंद्रपूर ४५.२ तसेच नागपूर येथे ४५ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.

उष्णतेची लाट इतकी तीव्र आहे की, दुपारी बारा ते पाच या वेळेत रस्ते ओस पडत आहेत. गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, ब्रम्हपुरी, अकोला आणि अमरावतीसारख्या शहरांमध्ये पारा ४४–४६ अंशांच्या वर गेल्याने बाहेर पडणे जिवावर बेतत आहे. वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका निर्माण झाला असून, नागरिकांनी आरोग्याची काळजी घेणे गरजेचे झाले आहे. दुपारी उन्हात काम करणे अशक्य झाल्याने मजुरीवर अवलंबून असणाऱ्या वर्गाचे, विशेषतः शेतमजुरांचे प्रचंड हाल होत आहेत.

विदर्भातील शेतकरी आधीच संकटात आहे. एका बाजूला भीषण उन्हाची काहिली असताना, गेल्या काही दिवसांत पूर्वमोसमी पावसाने हजेरी लावली. अकोला, वाशीम, बुलडाणा या भागात पावसाने आणि वादळी वाऱ्याने अक्षरशः झोडपून काढले. ऐन काढणीला आलेल्या कलिंगड, खरबूज आणि आंबा उत्पादकांची यामुळे झोप उडाली आहे. कांदा उत्पादक शेतकरी तर दुहेरी संकटात सापडला आहे; कडाक्याच्या उन्हात कांदा काढणी करणे आणि तरीही कष्टाचे भाव न मिळणे, अशी परिस्थिती आहे. शेतात मजुरांची टंचाई आणि वाढती मजुरी यामुळे शेतकरी आर्थिक कात्रीत सापडला आहे.


हवामान विभागाने पुढील काही दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. अशा वेळी, ग्रामीण भागात पाणी टंचाई जाणवू शकते. प्रशासनाने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शेतपिकांचे पंचनामे आणि पिकांचे नुकसान झाल्यास तात्काळ मदत जाहीर करणे आवश्यक आहे. शहरात काम करणाऱ्या मजुरांच्या वेळेत बदल करणे, उष्माघात प्रतिबंधक औषधे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध ठेवणे गरजेचे आहे.

विदर्भातील ही उष्णता निसर्गाचा कोप आहे, पण त्यासोबतच वाढते शहरीकरण आणि वृक्षतोड हे देखील कारणीभूत आहेत. सध्यातरी, या आगीसारख्या तापणाऱ्या जमिनीवर आणि विदर्भाच्या धगधगत्या दुपाऱ्यात, नागरिकांनी सुरक्षित राहणे आणि बळीराजाने धीर धरणे, हेच या संकटावरचे उत्तर आहे. प्रशासनाने योग्य वेळी दखल घेऊन मदत केल्यास, या अग्निपरीक्षेतून वाट काढणे सोपे होईल.

## होमिओपॅथी उपचार : साईड इफेक्ट कमी

गोड गोळी म्हणून जगभर प्रसिद्ध असणारी होमिओपॅथी औषध नुसतीच गोड गोळी नाही तर शरीरावर कुठलेही दुष्परिणामरहित शंभर टक्के पक्का इलाज म्हणून पाहिली जाते.

लहान बालकांपासून ते वयोवृद्धांपर्यंत आजारात आनंदाने घेण्यात येणारी औषध म्हणजे होमिओपॅथी आहे. १० एप्रिल हा होमिओपॅथीचे जनक डॉ. ख्रिश्चन फॅब्रिक सॅम्युअल ह्यानेमान यांचा जन्म दिवस आहे. यांचा जन्मदिन हा जगभरात होमिओपॅथी दिवस म्हणून साजरा केला जातो.




होमिओपॅथीची औषधी ही सर्वच दुर्धर आजारांवर वापरली जाते, त्याचे चांगले परिणाम रुग्णांवर दिसून येतात. बऱ्याच रुग्णांना इतर पॅथीच्या औषधांमुळे साईड इफेक्ट जाणवतात, काही पथ्य पाळावी लागतात. मात्र, होमिओपॅथीमध्ये तसे फारसे आढळून येत नाही. या पॅथीमध्ये व्यक्तीच्या दिसणाऱ्या लक्षणांची निरीक्षण करून शंभर टक्के बरे होणारे औषध दिले जाते. एकप्रकारे होमिओपॅथी हे नैसर्गिक हीलिंग करते. जिल्ह्यातील नामांकित डॉक्टर तसेच गोंदिया होमिओपॅथी कॉलेजचे प्राचार्य डॉ. रोशन कानतोडे सांगतात, होमिओपॅथीमध्ये संशोधन सातत्याने सुरू आहे.

कर्करोगांसारख्या रुग्णांना त्यांचे दुखणे कमी करण्यासाठी आता रुग्ण होमिओपॅथीकडे वळत आहेत, असे त्यांचे निरीक्षण आहे. यासह वृद्ध लोकांसाठी तसेच कुपोषित बालकांसाठीही होमिओपॅथी उपयोगी आणि तुलनेने परवडणारी ठरणारी पॅथी आहे. ते सांगतात, आपले आताचे जीवनमान फार बदललेले आहे. झोप व्यायाम आणि आहार याचे गणित आज चुकत आहे. हे गणित नीट बसले की आरोग्याची बरेच प्रश्न सुटू शकतात. मात्र, आजची जीवनशैली आपण बिघडवून ठेवली आहे. याला नियमित केल्यामुळे औषधांपासून लांब राहावे लागेल. गरज पडल्यास होमिओपॅथिक औषधीचा वापर करावा, प्रकृतीही सुधारते आणि आरोग्यावर कुठलाही दुष्परिणाम होत नाही. डॉ. कानतोडे यांच्या विद्यार्थीनी आकृती निनावे आणि खुशी तेजवानी या डॉक्टर आहेत. त्यांनी त्यांच्या पसंतीनेच होमिओपॅथी क्षेत्राकडे वळण्याचा निर्णय घेतला. या त्या क्षेत्रात पुढे चांगले काम करू इच्छितात.

अन्य वैद्यकीय क्षेत्राप्रमाणे या पॅथीच्या डॉक्टरांनाही सतत अभ्यास करावा लागतो. स्वतःला अपडेट ठेवावे लागते. अंतिमतः सर्वच पॅथीच्या मर्यादा तर आहेतच तसेच होमिओपॅथीच्याही काही मर्यादा आहेत. तरी तुलनेने रुग्णांची आवडती पॅथी म्हणून लोकमान्यता होमिओपॅथीला आहे.

**–जिल्हा माहिती कार्यालय, गोंदिया**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता, शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# ३० एप्रिल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मदिवस विशेष

## देशात समता नांदवा, 'ग्रामजयंतीचा' मंत्र घ्या हो नवा!

आज साठ वर्षांआधीचे आमचे बालपण आठवते. फाटके कपडे, तुटक्या चपलाही पायात नव्हत्या. फाटक्या कपड्याला लावायला चिंधी सापडत नव्हती. मायच्या हाताची सुई–दोऱ्याची तुरपाई सिलाई मशीनला लाजवायची. बापाचे ठिगळं झालेलं धोतर, मायच्या लुगड्याच्या चिंध्या यातून माय वाकळ शिवायची तीच वाकळ, गोधडी आमचं पांघरूण होते. वाकळ थंडीत गरम वाटायची तर उन्हाळ्यात शरीराला नरम वाटून मायची माया त्यात जाणवायची.

घराघरातली माय कुरड्या, पापड, धापोडे, शेवया, सरगुंडे बनवायची ही उन्हाळी यात्रा प्रत्येक परिवारात सुरू राहायची. आमचे चिमुकले हात थोडीफार मदत करायचे. पावसाळा येणार, माय सुंदर मातीची चूल बनवायची, आम्ही मातीत हात भिजवीत आनंद घेत होतो.गावखेड्यात तर ह्या सर्व कार्यात मदतीला शेजारी–पाजारी असलेल्या धर्माच्या आज्या, मावश्या, आत्या, माम्या असायच्या. त्यांची जात, धर्म कधीच आडवी येत नव्हती.

गावगाड्यातील देवळाच्या पारावर आरती, भजन सोबतच गावातल्या अनेक समस्यांवर वडीलधारी मंडळींची चर्चा व्हायची, त्यातून अनेक गावसमस्या सुटायच्या. अन्नधान्याचा दुष्काळ गावांनी खूप काळ पाहिला, पण गावातील प्रेमाच्या ओलाव्याने उपासमार टळली. एका भाकरीतील चौथकोर शेजाऱ्याला द्यायची हा शेजारधर्म पाळला जायचा. गावात पाहुणचाराला आलेले पाहुणे गावचे पाहुणे असायचे. त्यांचा पाहुणचार ज्यांच्या घरी आले त्यांच्यापेक्षा शेजारी–पाजारीच जास्त करायचे.

### गावगाड्यातील लग्न हा गावचा उत्सव

गावगाड्यात बोटावर मोजण्याइतके श्रीमंत असायचे. मोठा मानवी समूह यांचा जीवनसंघर्ष कर्जबाजारीच असायचा. गावातील एखाद्या कुटुंबातील विशेषतः मुलीचं लग्न सर्व गावगाड्याच्या सहकार्यातून घडायचे. रात्रीचे लग्न असायचे उन्हामुळे आकाशाच्या मांडवाखाली गॅसबत्तीच्या प्रकाशात. कारण शेतकऱ्यांचा हंगाम नसायचा. लग्न घरासमोर झाडाच्या हिरव्यापानांचा मांडव उन्हाचा तडाखा थंड करायचा. या घरातील लगीनघाई मुहूर्ताच्या पाच–सहा महिने आधीच सुरू व्हायची. गावातल्या बाया–बापड्या धान्य निवडायला दुपारी लगीनघरी जमायच्या. काही म्हाताऱ्या सुंदर गाणे म्हणत काम करणाऱ्यांना स्फूर्ती द्यायच्या. लगीनघरी कमी असेल ते भांडे–कुंडे, गोण्या, वाकळी, गाद्या, धान्य अनेक घरातून मदत यायची. तेथे पिढ्यानपिढ्यांचा भांडणतंटा मिटलेला हे गावगाड्याचं काम म्हणून सहकार्याची भावना. आम्ही शहरात राहणारे आईच्या माहेरी मामाच्या गावात गावभाचे. रानमेवा खाण्याची रेलचेल. गावात आलेल्या पाहुण्यांच्या पंगती लग्नात प्रथम बसायच्या तो त्यांचा मान. गावातले लहान पोरं भुकेलेली राहायची, कारण चुलीला आवतन. माय–बाप लग्नघरच्या कामात व्यस्त.

हा वेगळाच जीवनाचा आनंद आज गावगाड्यातही संपत चालला आहे. गावच भकास होत आहे. कुडाच्या घरांची जागा सिमेंट–काँक्रीटने घेतली. प्रशस्त वाडे, अंगण, पळसबाग सारंच संपलं संयुक्त घराच्या वाटण्यांनी घरपणच हरपलेलं आहे. शहरीकरणातला मतलबपणा गावखेड्यात पोहोचला आहे. बैलजोडीची आणि गोधनाची श्रीमंती आज यंत्राच्या गाड्या–घोड्यांनी घेतली. कोंबड्यापालन आणि बकऱ्या धन वाढलं. आज खेड्यातच दही, दूध मिळेनासं झालं.

पोशिंदा म्हणविशी जगाचा, तुझे पाठीशी पोट ।

ऐतखाऊंच्या दारी वाहते, दह्या–दुधाचे लोट ।


राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेच्या एका ओवीत लिहिले :

गाव हा विश्वाचा नकाशा ।
गावावरून देशाची परीक्षा ।
गावचि भंगता अवदशा । येईल देशा
?४९? ग्रा. अ. १

भंगलेली गावे सावरली जावी याची चिंता आज सत्ताधाऱ्यांना, शिक्षितांना वाटत नाही, असे जाणवते.

### ग्रामजयंतीचा मंत्र घ्या हो नवा

ही गावखेड्यांना येणारी अवदशा राष्ट्रसंत तुकडोजींना १९५५ ला ग्रामगीतेच्या निर्मितीच्या वेळेसच लक्षात आलेली होती. राष्ट्रसंतांच्या सोबत गुरुदेव सेवा मंडळात काम करणाऱ्या काही प्रेमीजनांनी राष्ट्रसंतांकडे एक प्रस्ताव ठेवला त्यांचा जन्मदिवस साजरा करण्याचा. साधेभोळे प्रेमीजन, त्यांच्या भावना जरी सात्विक होत्या, तरी स्तोम माजवण्याच्या प्रवृत्तीला राष्ट्रसंतांचा विरोध असायचा. कारण गुरु–शिष्य अशा परंपरा त्यांना मान्य नव्हत्या. पण शेवटी प्रेमीजनांच्या आग्रहाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हण–तात, "गड्यांहो, माझा जन्मदिवस साजरा करण्यापेक्षा तुम्ही तुमच्या गावाचा जन्म दिवस समजून 'ग्राम जयंती' म्हणून साजरा करा.' आपला



जन्मतारखेचा २९ एप्रिल की ३० एप्रिल हा घोळ मिटवत ३० एप्रिल १९०९ हा जन्मदिवस राष्ट्रसंतांनी घोषित केला. त्यांनी ग्रामजयंती यावर भजन, लेख लिहिले. ते एका भजनात लिहितात :

ग्रामजयंतीचा मंत्र घ्या हो नवा ।
देशात समता नांदवा ?

भारत हा विविध धर्म, भाषा, संस्कृती यांनी नटलेला त्यात एकात्मता असावी. कारण स्वातंत्र्यानंतर राष्ट्रभक्तीची जागा राजकारण्यांच्या विकृत राजकारणाने जाती, पोटजात, धर्म, भाषा यांमध्ये मानवी मनच वाटली. स्वाभिमानी राष्ट्राचे स्वातंत्र्यवीरांचे स्वप्न ७५ वर्षांत आम्ही पूर्ण करू शकलो नाही. आजही स्वावलंबी भारताचे स्वप्न अपूर्णच आहे. राष्ट्रसंत व्यथा मांडतात :

एकाच्या महालात फुलताति बागा ।
दुसऱ्यास धड नाही राहण्यास जागा ?
अन्नासाठी फिरतो नागवा ?
देशात समता नांदवा ।
ग्रामजयंतीचा मंत्र घ्या हो नवा ?

मित्रांनो, ही श्रीमंती–गरिबीची मानवी तफावत आज देशात सपाटून वाढत आहे. मोफत घरकुल, मोफत धान्य लाखो कुटुंबांना मिळूनही तरी उघड्यावर दिवस काढणारे आहेत. मुठभरांची श्रीमंती कवेत मावत नाही. श्रीमंतांच्या घरांची संख्या वाढली, कुटुंब लहान झाले. अनेकांची मुले विदेशातच स्थिरावली. हा भेदाभेद कसा मिटणार?

क्रांतीची ही लाट गावात आली ।
सत्यास न्यायास प्रेमास व्याली ?
राखा हिच्या वैभवा ?
देशात समता नांदवा । ग्राम जयंतीचा मंत्र घ्या हो नवा ?

आज गावांमध्ये शेतीकामाला मजूर नाही. शिकलेली मुले गावाकडे यायला तयार नाहीत. श्रमाची लाज सर्वांनाच वाटत आहे. सर्व उत्पादनाची भाववाढ होते. शासकीय अथवा खासगी नोकर वर्ग पगारवाढीसाठी संघटित प्रयत्न करतात. शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग आपल्या वस्तूचे भाव ठरवतात. पण शेतकऱ्यांच्या उत्पादनाला गेल्या पंचवीस–तीस वर्षांत खर्चाएवढेही दाम मिळते का? याची कोणालाच या देशात चिंता नाही. जे शेतकरी आंदोलने होतात त्यांना चिरडण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून होतो. मला वाटतं, एकदा निसर्गानेच मोठा अन्नधान्याचा दुष्काळ पाडावा जो आम्ही साठ ते ऐंशीच्या दशकात भारतात प्रत्येकाने अनुभवला. तेव्हाच अन्नधान्य निर्माण करणाऱ्या शेतकऱ्याचे महत्त्व पटेल.

तो दास तुकड्या विनवुनि सांगे ।
बैसू चला सर्व एकाचि रांगे ?
निजधर्मतत्त्वा जागवा ?
देशात समता नांदवा । ग्रामजयंतीचा मंत्र घ्या हो नवा ?

मित्रांनो, शेवटी आम्ही हाडामासाची माणसं आहोत. तरी आम्ही आमच्यातली माणुसकी गहाण का ठेवतो? राष्ट्रसंत यांच्यासारखा मानवतावादी आपल्याला विनवून सांगतो एका समतेच्या रांगेत बसून मानवतेच्या धर्माला जागवा. मानवसमूहातल्या देवांना राष्ट्रसंत वर मागतात :

नांदोत सुखे गरिब–अमीर एकमतानी ।
मग हिंदू असो, ख्रिश्चन वा हो इस्लामी ।
'स्वातंत्र्य सुखा' या सकलांमाजि वसू दे ।
दे वरची असा दे, या भारतात बंधू–भाव नित्य वसू दे ?
सकळांस कळो, 'मानवता राष्ट्रभावना' ।
हो सर्वस्थळी मिळूनि, 'समुदाय प्रार्थना' ।
उद्योगी तरुण वीर, शीलवान दिसू दे ।
दे वरचि असा दे ?

मित्रांनो, संत–महापुरुषांच्या स्वप्नातील भारत त्यांनी स्वातंत्र्यासाठी सांडवलेले रक्त, गाळलेला घाम याचा विचार तुम्ही आपल्या येणाऱ्या पिढ्यांना सुखी, स्वाभिमानी करण्यासाठी करणार आहात का? उठा, देशात समता नांदावी म्हणून महापुरुषांच्या विचारांची प्रेरणा घेऊया!

**ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक**
**अभ्यासक, राष्ट्रसंत तुकडोजी विचारधारा ९८२३९६६२८२**

## जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्याला नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**गोंदिया :–** भारत सरकारने वर्ष २०२७ मध्ये जनगणना घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात घरयादी व घरगणना दि.१६ मे ते १४ जून २०२६ या तीस दिवसाच्या कालावधीत होणार आहे. त्यामुळे आपल्या घरी जनगणना करण्यासाठी प्रगणक येणार असून जिल्ह्यातील नागरिकांनी यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

गोंदिया जिल्हयात एकूण १६ चार्ज जनगणना कार्यालये असून त्यामध्ये ८ तहसिल कार्यालये, ३ नगर परिषद कार्यालये, ५ नगरपंचायत कार्यालये आहेत. गोंदिया जिल्ह्याकरीता एकूण २२५० कङइ (House Listing Blocks) निर्माण करण्यात आले असून, जिल्ह्याकरीता एकूण १ मास्टर ट्रेनर, ४४ फिल्ड ट्रेनर, २३९२ प्रगणक व ४०९ पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

दिनांक १ मे २०२६ पासून स्वगणना (Self Enumeration) सुरु होणार आहे, ज्यामध्ये नागरीकांना वेब पोर्टलच्या माध्यमातून स्वतःची माहिती सुरक्षीतपणे भरता येणार आहे. स्वगणना (Self Enumeration) ऑनलाईन se.census.gov.in पोर्टलवर जाऊन करु शकता व प्रगणक आपल्या घरी आल्यानंतर त्यांच्याशी SEID शेअर करावे.




तसेच जनगणना २०२७ चा पहिला टप्पा घरयादी व घरगणना दिनांक १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या तीस दिवसाच्या कालावधीत होणार आहे. यामध्ये ३ ३ प्रकारचे प्रश्न विचारुन प्रत्येक घराची माहिती नोंदविली जाईल, तसेच घराची स्थिती, सुविधा आणि मुलभूत माहिती गोळा केली जाईल.

**जनगणनेचे फायदे** : भविष्यातील धोरणांचा अचूक आधार, संसाधनाचे योग्य वितरण, योग्य ठिकाणी योग्य योजना, चांगल्या शाळा, रुग्णालये आणि रस्ते, प्रत्येक गट आणि प्रत्येक क्षेत्राचा सर्वांगीण विकास. तुमची माहिती जनगणना अधिनियम, १९४८ नुसार गोपनीय ठेवली जाते. नाव व ओळख सार्वजनिक केली जात नाही. डाटा फक्त राष्ट्र उभारणीच्या कामासाठी वापरला जातो. जेव्हा प्रगणक (Enumerator) आपल्या घरी येईल, तेव्हा योग्य आणि पूर्ण माहिती देण्यात यावी. तुमची एक योग्य माहिती येत्या अनेक वर्षासाठी देशाच्या विकासाची दिशा ठरवते. योग्य माहिती द्या, जनगणना प्रक्रियेत अभिमानाने सहभाग नोदवा, देशाच्या विकासात सोबती व्हा.

गोंदिया जिल्ह्यासाठी नियुक्त करण्यात आलेले २३९२ प्रगणक व ४०९ पर्यवेक्षक यांचे जिल्ह्यातील सर्व तहसिल कार्यालय व नगरपरिषद/नगरपंचायत कार्यालय स्तरावर तीन दिवसीय प्रशिक्षण दि.२३ एप्रिल २०२६ पासून सुरु झाले असून दि.८ मे २०२६ पर्यंत ४ ते ५ बॅचेसमध्ये चालणार आहे. अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी मानसी पाटील यांनी दिली आहे.

### आदिवासी विकास विभागाच्या भरतीत प्रवर्गाला एकही जागा नाही

अर्जुनी/मोर. –महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत नुकतीच गट "ड' मधील ४१६ पदांच्या सरळसेवा भरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. मात्र या भरती प्रक्रियेमध्ये अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गासाठी एकही जागा उपलब्ध नसल्याचा गंभीर आरोप करत अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेतर्फे तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.या संदर्भात मुख्यमंत्री यांना तहसीलदार, अर्जुनी/मोर यांच्या मार्फत निवेदन सादर करण्यात आले. भरती प्रक्रियेत आदिवासी समाजावर अन्याय होत असून, हा घटनात्मक हक्कांवर थेट आघात असल्याचा आरोप परिषदेकडून करण्यात आला आहे.परिषदेकडून देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बिंदू नामावलीतील त्रुटीमुळे अनुसूचित जमाती आरक्षणाचा बिंदू क्रमांक ८ वर गेल्याने आदिवासी उमेदवारांना या भरती प्रक्रियेत संधीच मिळालेली नाही. राज्यातील आदिवासी युवक–युवती शिक्षण घेऊन स्पर्धा परीक्षांची तयारी करत असताना शासनाच्या भरती प्रक्रियेतूनच त्यांना डावलले जात असल्याची भावना समाजात निर्माण झाली आहे.

## फडणवीसांनी महाराष्ट्र नासवला–श्याम मानव

दिनांक २५ एप्रिल २०२६ ला अमरावती येथील सांस्कृतिक भवनात अमरावती जिल्ह्यातील अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती तथा इतर समविचारी संघटनांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाला खासदार बळवंत वानखडे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध विचारवंत लेखक प्रशिक्षक तथा संघटक प्रा. प्रेम कुमार बोके जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष शिवमती सीमा बोके आम्ही भारतीय जनसंस्कृतिक चळवळ चे डॉक्टर प्रकाश मानेकर संभाजी ब्रिगेडचे तुषार दादा देशमुख गणेश गहूकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार मंचाच्या वतीने मी स्वतः या कार्यक्रमांमध्ये उपस्थित होतो. अगदी सुरुवातीला श्याम मानव यांनी आपल्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरात प्रकरणात पोलिसांना छान कारवाई करू दिली याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. अशोक खरात यांच्यावर कारवाई झाली याचं कारण सांगत असताना मानव असे म्हणाले की एकनाथ शिंदे त्यांचे ३९ आमदार केसरकर यांनी सांगितल्याप्रमाणे यांनी सगळेच या बाबाचे भक्त होते आणि या बाबाच्या पाठीशी आपली सत्ता आणि संपत्ती उभी करत होते रूपालीताई चाकणकर अजित दादा चा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या पाठीशी आता कोणीही उभं नाही आणि त्या अजितदादांच्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्या आहेत आणि म्हणून अजित दादाच्या राष्ट्रवादीला आणि एकनाथराव शिंदे यांच्या खोट्या शिवसेनेला एक राजकीय संदेश देऊन अशोक खरात वर कारवाई करण्यात आली परंतु जादूटोणाविरोधी कायद्यानुसार हे सगळे ३९ मंत्री रूपालीताई चाकणकर ज्यांनी ज्यांनी प्रचार प्रसार केला त्या संस्थेतले सर्व पदाधिकारी या सर्वांवर हा कायदा लागू होतो आणि या कायद्यानुसार सात वर्षाची शिक्षा आणि पन्नास हजार रुपयांचा दंड होऊ शकतो इतका व्यापक हा कायदा आहे.

श्याम मानव म्हणाले की खरात प्रकरणात जर भारतीय जनता पक्षाचे मोठे दोन–तीन मंत्री सहभागी झाले असते बाबाचे भक्त असते तर अशोक खरात वर कार्यवाही झाली असती का? याचे उत्तर नाही अस आहे असेही ते म्हणाले. आदित्य ठाकरे यांनी दिशा सालीयन हीच्यावर बलात्कार करून तिचा खून केला असं खोटं एफिडेविट लिहून द्या अनिल देशमुख यांनी नकार दिला आणि कुठलंही कारण नसताना या महाराष्ट्राच्या गृहमंत्र्याला ११ महिने जेलमध्ये डांबून ठेवण्यात आलं. आपल्या राजकारणासाठी हा माणूस कोणत्या स्तराला जाऊ शकतो याची कल्पना महाराष्ट्राला आहे. अलीकडेच फडणवीस यांनी म्हटलं होतं महिला आरक्षणाच्या संदर्भात मी ओपन चॅलेंज देतो आपण डिबेट करू पण त्यांनी एक खूटी मारली आणि ती म्हणजे माझ्या स्तरातला कुठलाही नेता असो त्यांच्याशीच मी चर्चा करीन आणि वर सांगितलेल्या प्रकरणावरून तुम्हाला त्यांचा स्तर कळला असेल. जादूटोणाविरोधी कायदा हा एक मताने संमत झालेला




कायदा आहे सगळ्याच पक्षाच्या लोकांनी त्याला संमती दिली आणि त्यासाठी श्याम मानव सरांनी त्यांना मानसिकरित्या तयार केलं होतं नरेंद्र दाभोळकर सरांनी जो कायदा सबमिट केला होता त्या कायद्याला कोणीही मंजुरी द्यायला तयार नव्हते दाभोळकर गेल्यानंतर मानवांनी हा कायदा हातात घेतला आणि त्याचा प्रारूप तयार केलं आणि नंतर या कायद्याला विरोध करावा अशी स्थितीच निर्माण झाली नाही एवढा तो कायदा संतुलित बनलेला होता.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपली सगळे शस्त्र गर्भगळीत होऊन रामदासाच्या पायावर मस्त ठेवले होते आणि मग रामदासाच्या प्रेरणेने त्यांनी स्वराज्य निर्माण केले असं वक्तव्य धीरेंद्र कृष्ण शास्त्री नावाच्या भोंदू बाबांनी केलं त्याचा समाचार घेत असताना नागपूरचा प्रकरण मानव सरांनी समजावून सांगितलं आणि फडणवीस यांनी कुठल्याही प्रकारची कार्यवाही होऊ दिली नाही हे त्यातलं वास्तव आहे धिरेंद्र कृष्ण महाराज अर्धवट कार्यक्रम सोडून पळाला नंतर त्याला स्वतःची दिव्यशक्ती सिद्ध करा ३० लाख रुपये आव्हानात्मक बक्षीस तुम्हाला देता येईल आणि आम्ही आमचं काम सोडू देवू असे आव्हान दिले परंतु ते त्यांनी काही स्वीकारलं नाही. त्याच्यामुळे आव्हान न स्वीकारल्यामुळे हा बाबा बदमाश आहे भोंदू आहे हे सिद्ध होईल आणि त्यांनी आव्हानातून पळ काढला धिरेंद्र कृष्ण महाराज हा कुठली गोष्ट सिद्ध करू शकला नाही. एवढं सगळं होऊन सुद्धा त्याच्यावर कुठलाही एफ आय आर दाखल करण्यात आला नाही उलट त्याला भारतीय जनता पक्ष आणि देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात फिरवलं आणि लोकांच्या अंधश्रद्ध वाढवल्या प्रदीप मिश्राचे कार्यक्रम सुद्धा भारतीय जनता पक्षाचे आणि देवेंद्र फडणवीस यांचे वतीने मोठे कार्यक्रम आयोजित केले जातात आणि हा बाबा सुद्धा फक्त महादेवाच्या पिंडीला सहद लावलेलं बेलपत्र चिटकवलं की मुलगा हा पास होतो परंतु त्याचा पोरगा नापास झाला.

पत्रकारांनी विचारलं तेव्हा तो म्हणाला लोकांना हा नुस्का सांगता सांगता मी माझ्या मुलांना सांगायचं विसरलो त्यामुळे तो नापास झाला. ह्या अशा बाबाला देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रभर फिरवतात आणि लोकांच्या अंधश्रद्धा वाढवतात.

जादूटोणा कायदा प्रचार प्रसार अंमलबजावणी समिती तयार करण्यात आली आणि मानव त्याचे सहअध्यक्ष आहेत उद्धव ठाकरे च्या काळामध्ये दहा कोटी रुपये अजितदादांनी मंजूर केले आणि लॉकडाऊन लागलं दोन वर्षे गेली त्यानंतर पुन्हा कामाला सुरुवात केली आणि सरकार पडलं नंतर पुन्हा फडणवीस आले फडणवीस यांना त्यांच्या घरी जाऊन या कायद्याच्या संदर्भात अंमलबजावणी आपण करणार आहात का तर त्यांनी सांगितलं परंतु तीन वर्षे त्यांनी काहीही केलं नाही नंतर अजित दादा आले अजित दादांना भेटलो १४ कोटीचा त्यांनी निधी मंजूर करून दिला परंतु मी स्वतः चकरा मारू मारू थकून गेलो पण जीआर निघाला नाही तेव्हा मला सांगण्यात आलं की हे काम काही असं होणार नाही त्यासाठी तुम्हाला दहा टक्के एक प्रकारची लाच द्यावी लागेल मानवांनी सांगितले की मला लाच मागायची तुमची हिम्मत कशी झाली

उद्धव ठाकरे यांचं अडीच वर्षाचे सरकार आणि त्यातला कोरोना सोडला तर सलग आपल्या महाराष्ट्राचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री असले तरी ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब आहे आणि त्यांनी या जादूटोणाविरोधी कायदा बद्दल कुठल्याही प्रकारचं काम केलं नाही करू दिलं नाही. ऑलरेडी पोलिसांचं प्रशिक्षण झालं होतं ते मुख्यमंत्री असताना. नंतर शिक्षकाचे प्रशिक्षण करायचं होतं अंगणवाडीच्या सेविका असा खूप मोठा व्यापक विषय हा प्रचार आणि प्रसाराचा करायचा होता आणि हे सगळं जर केलं असतं तर हा अशोक खरात नावाचा बाबा इतका मोठा झालाच नसता आणि त्यांनी जे आपल्या स्त्रियांचे शोषण केलं ते एवढ्या मोठ्या प्रमाणावर तो शोषण करू शकला नसता त्यामुळे अशोक खरात सारखा बाबा जो बाहेर आलेला आहे असे अनेक बाबा आहेत जे आजही मोठ्या प्रमाणावर महिलांचे शोषण करतात आणि लोकांना अंधश्रद्धे मध्ये ढकलतात त्यामध्ये प्रदीप मिश्रा वीरेंद्र कृष्ण महाराज यांना स्वतः भाजपच महाराष्ट्रामध्ये आनतं आणि लोकांच्या अंधश्रद्धा वाढवतं त्यामुळे खरात सहित जे जे बाबा असतील त्यांनी जे महिलांचे शोषण केलं लोकांच्या अंधश्रद्धा वाढवल्या आणि हे भयंकर प्रकार प्रकरण पुढे आलं याचं सगळ्यात मोठं पाप जर कोणी केलं असेल तर ते देवेंद्र फडणवीस यांनी केल आहे असे श्याम मानव म्हणाले.

फक्त लोकांच्या अंधश्रद्धा वाढवूनच निवडून येता येतं असं नाही तर लोकांचं चांगलं काम करूनही आपण निवडून येऊ शकतं आणि म्हणून लोकांचे चांगलं काम करा जर तुम्ही हा जादूटोणा विरोधी कायदा नीटपणे राबवला नाही तर आपण हा महाराष्ट्र नासवला असं म्हणून एक खलपुरुष म्हणून तुमची इतिहासात नोंद होईल.

**हेमंत टाले ९९७५८०७६३२**

# गोंदिया जिल्ह्यात १४२ रुग्णांना सुमारे १.२० कोटींची मदत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

**गोंदिया :–** शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी ङ्गआधारफ ठरत आहे. गोंदिया जिल्ह्यात आर्थिक वर्षात १४२ रुग्णांना सुमारे १ कोटी २० लाख ४० हजार रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहायता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**आर्थिक वर्षातील मदत**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत गोंदिया जिल्ह्यातील १४२ रुग्णांना सुमारे ०१ कोटी २० लाख ४० हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून गोंदिया जिल्ह्यातील गरजू रुग्णांना १.२० कोटींपेक्षा अधिकची वैद्यकीय मदत करण्यात आली आहे. ही योजना अनेक कुटुंबांसाठी मोठा आधार ठरत आहे. जलद, पारदर्शक आणि संवेदनशील कार्यपद्धतीमुळे पात्र रुग्णांना वेळेत उपचारासाठी आर्थिक सहाय्य मिळत आहे. गरजूंनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख, रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

### २० गंभीर आजारासाठी मदत

**कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी आर्थिक सहाय्य दिले जाते.**

### सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.**

# ग्राम स्वच्छता अभियान; जिल्हास्तरीय तपासणीला सुरुवात

**गोंदिया:–** गाव परिसर स्वच्छता व नागरिकांच्या सक्रीय सहभागातून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. संत गाडगेबाब ग्राम स्वच्छता अभियान सन २०२५–२६ अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी स्वच्छ ग्राम स्पर्धा प्रत्येक जिल्हा परिषद गटात राबविण्यात आली आहे. प्रत्येक जिल्हा परिषद गटातून प्रथम येणाऱ्या ग्रामपंचायतीचा तालुकास्तरील तपासणी समितीकडून प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सर्वात जास्त गुण प्राप्त करणाऱ्या ९ ग्रामपंचायतीची जिल्हास्तरीय तपासणी होणार असून वा तपासणी अभियानाला आज २७ एप्रिलपासून सालेकसा तालुक्यातील तिरखेडी या गावापासून सुरुवात झाली आहे.



अभियानाच्या माध्यमातून गावांमध्ये तयार होणाऱ्या स्वच्छतेच्या नव्या सुविधा, नागरिकांचे स्वच्छतेबाबतीत होणारे मतपरिवर्तन व गावागावातून सुरु असलेल्या स्वच्छतेच्या चळवळीत प्रामीण भागातील सर्व नागरिक, ग्रामस्थांचा सक्रीय व सातत्यपूर्ण सहभाग घेवून त्यांच्या वेगवेगळ्या ग्रामपंचायती, तालुके, व जिल्हयात स्वच्छतेच्या प्रगतिबाबत एक सर्व समावेशक स्पर्धा राबवून व त्या माध्यमातून प्रामस्थांना प्रोत्साहित करून स्वच्छतेच्या कार्यक्रमाचे महत्व पटवून देण्याकरिता जिल्हयात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातून जिल्हयात स्वच्छतेचा जागर करून ग्रामपंचायतीत समाविष्ट गावातील वैयक्तिक शौचालये, त्यांचा वापर, मागणी, हागणदारीमुक्त तपासणीचा अहवाल, त्या अनुषंगाने दुरुस्त करावयाची शौचालये, गावे हागणदारीमुक्त म्हणून घोषित होणार आहेत. त्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत जिल्हास्तरीय तपासणी समितीच्या

माध्यमातून या अभियानाला सुरुवात झाली आहे. अभिवान अंतर्गत जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पुरस्कार तसेच विशेष पुरस्कार म्हणून स्व. वसंतराव नाईक पुरस्कार, सांडपाणी व्यवस्थापन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार, पाणी व गुणवत्ता तसेच व्यवस्थापन तसेच स्व. आबासाहेब खेडकर पुरस्कार, शौचालय व्यवस्थापन या पुरस्कारासाठी एकूण ६ ग्रामपंचायतीची निवड करावयाची आहे.

### या गावांची होणार तपासणी

**संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी स्वच्छ ग्राम स्पर्धा प्रत्येक जिल्हा परिषद गटात राबविण्यात आली. त्याची जिल्हास्तरीय तपासणी आता सुरू झाली आहे. एकूण ९ ग्रामपंचायतींचा यामध्ये समावेश असून यामध्ये सालेकसा तालुक्यातील तिरखेडी, आमगाव तालुक्यातील सुपलीपार, गोंदिया तालुक्यातील तांडा, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील वेडगाव/रेल्वे व वडेगाव/बंध्या, सडक अर्जुनी तालुक्यातील गिरोला, गोरेगाव तालुक्यातील मोहगाव बु., तिरोडा तालुक्यातील पांजरा व मरारटोला यांची तापसणी २७ ते ३० एप्रिल या कालावधीत होणार आहे.**

# १५०० कृषी केंद्रांचे 'शटर डाऊन'

**गोंदिया :–** कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या बंदचा फटका थेट शेतकऱ्यांना बसला असून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर हालअपेष्ठ सहन कराव्या लागत आहेत. माफदा संघटनेच्या आवाहनानुसार जिल्ह्यातील १५०० कृषी सेवा केंद्रांनी सोमवारी (दि.२७) बंद पाळल्याने खत, बियाणे आणि कीटकनाशकांची खरेदी पूर्णपणे ठप्प पडली.जिल्ह्यातील दीड हजार खत परवानाधारकांनी १०० टक्के बंद पाळला आहे. जिल्ह्यातील विक्रेत्यांनी बंद पाळत आंदोलन १०० टक्के यशस्वी केल्याचा दावा ममाफदाफसंघटनेने केला आहे. दरम्यान, जिल्ह्यातील दीड हजार परवानाधारक विक्रेत्यांमध्ये अनुदानित खत विक्री करणाऱ्या परवानाधारकांची संख्या हजाराच्या घरात आहे. मात्र, तेही आंदोलनात सहभागी झाले असल्याची माहिती संघटनेच्यावतीने देण्यात आली.

सध्या खरीप हंगामाच्या पूर्वतयारीचा काळ सुरू असल्याने शेतकरी मोठ्या प्रमाणात शेतीसाठी आवश्यक निविष्ठांची खरेदी करतात. मात्र, अचानक पुकारण्यात आलेल्या बंदमुळे अनेक शेतकऱ्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले. काही ठिकाणी शेतकरी सकाळपासून दुकानांसमोर प्रतीक्षा करत होते; परंतु दुकाने बंद असल्याने त्यांची निराशा झाली. विशेषतः लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांवर या परिस्थितीचा अधिक परिणाम झाला आहे.

# ७५ मचाणांवरून होणार वन्यप्राणी गणना

**गोंदिया :–** नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पात येत्या शुक्रवारी (दि.१) वन्यप्राणी गणना निसर्गानुभव – २०२६ चा मुहूर्त निघाला आहे. या वन्यप्राणी गणनेत १५० स्वयंसेवक सहभाग घेत असून ७५ मचाणांवरून यंदाची वन्यप्राणी गणना होणार आहे.



दरवर्षी बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी पाणवठ्यांवरील वन्यप्राणी गणना निसर्गानुभव कार्यक्रम घेतला जातो. त्यानुसार, शुक्रवारी (दि.१) वन्यप्राणी गणना निसर्गानुभव कार्यक्रम घेतला जात आहे. या गणनेत १५० निसर्गप्रेमी सहभागी होणार आहेत. तर वन्यप्राणी गणनेसाठी ७५ मचाण तयार करण्यात आले असून त्यावरून वन्यप्राणी गणना केली जाणार आहे. शुक्रवारी (दि.१) दुपारी २ वाजता वन्यप्राणी गणनेसाठी स्वयंसेवक प्रवेश करणार असून शनिवारी (दि.२) सकाळी १० वाजता ते बाहेर पडतील.

या वन्यप्राणी गणनेत १५० स्वयंसेवक सहभागी होणार असतानाच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारीही त्यात सहभागी होणार आहेत. यामुळे एका मचाणवर दोन स्वयंसेवक व एक वन कर्मचारी असे तीन जण राहतील.

# जिल्ह्यातील शाळांना २ मे पासून उन्हाळी सुट्टी

## नवीन शैक्षणिक वर्ष १५ जून पासून सुरु होणार

**गोंदिया :–** राज्यातील सर्व राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसाठी सन २०२६ मधील उन्हाळी सुट्टी व शैक्षणिक वर्ष २०२६–२७सुरु करण्याबाबत शिक्षण विभागाने महत्वपूर्ण निर्देष जारी केले आहेत. या निर्णयामुळे राज्यभरातील शाळांच्या वेळापत्रकात एक समानता व सुसंगती येणार असून विद्यार्थी, पालक व शिक्षकांना स्पष्ट मार्गदर्शन मिळणार आहे.



शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक पुणे) यांच्या २८ मार्च रोजीच्या पत्रानुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये उन्हाळी सुट्टीचा कालावधी एकसारखा ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार राज्य मंडळाच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना शनिवार २ मे पासून उन्हाळी सुट्टी जाहीर करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे शाळांमध्ये एकसमान शैक्षणिक नियोजन शक्य होणार आहे.

दरम्यान इतर शिक्षण मंडळाच्या शाळांबाबत स्वतंत्र भूमिका ठेवण्यात आली आहे. अशा शाळांमध्ये जर नियोजित वेळापत्रकानुसार शैक्षणिक उपक्रम सुरु असतील किंवा महत्वाचे कार्यक्रम आयोजित केलेले असतील तर विद्यार्थ्यांना सुट्टी जाहीर करण्याबाबत संबंधित शाळा प्रशासनाने त्यांच्या स्तरावर योग्य निर्णय घेण्यात निर्देश देण्यात आले आहेत. नवीन शैक्षणिक वर्ष २०२६–२७ बाबतीत शिक्षण विभागाने स्पष्ट मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. त्यानुसार राज्य मंडळाच्या सर्व शाळा सोमवार १५ जून रोजी नियमित सुरु करण्यात येणार आहेत. यामुळे संपूर्ण राज्यात एकाच दिवशी नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात होणार असून शैक्षणिक प्रक्रियेला गती मिळणार आहे.

विशेषतः विदर्भ विभागासाठी स्वतंत्र सूचना देण्यात आल्या आहेत. जून महिन्यातील उष्णतेचा विचार करता विदर्भातील शाळा १५ ते २१ जून या कालावधीत सकाळच्या सत्रात चालविण्यात येणार आहेत. या काळात शाळांची वेळ सकाळी ७.३० ते ११.४५ अशी राहणार आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करूनहा निर्णय घेण्यात आला आहे

**निर्णयाचे स्वागत**

त्यानंतर मंगळवार ३० जून पासून शाळा नियमित वेळेनुसार सुरु करण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेपासून विद्यार्थ्यांचे संरक्षण होणार असून शिक्षणात कोणताही अडथळा येणार नाही, याची काळजी घेण्यात आली आहे. तसेच सकाळच्या सत्रामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढण्यासही मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. शिक्षण विभागाच्या या निर्णयाचे शिक्षक व पालकांकडून स्वागत करण्यात येत आहे. विशेषतः विदर्भासारख्या उष्ण प्रदेशात सकाळी शाळा घेण्याचा निर्णय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# शिक्षण विभागातील रिक्त पदे सेवाज्येष्ठतेनुसारच भरा,जनता शिक्षक महासंघाची मागणी

**गोंदिया:–** जिल्हा परिषद शाळांमध्ये कार्यरत उच्च श्रेणी मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व गटशिक्षणाधिकाऱ्यांची पदे खूप मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. या रिक्त पदामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे. करिता ही सर्व पदे लवकरात लवकर सेवा ज्येष्ठतेनुसारच भरण्यात यावीत, अशी मागणी जनता शिक्षक महासंघ व भाजप शिक्षक आघाडी यांच्या संयुक्त वतीने करण्यात आली असून, यासाठी शिक्षणाधिकारी पवन खंदारे यांना निवेदन देण्यात आले. जिल्ह्यातील बहुतांश शिक्षकांचे थकीत असलेली वेतन देयके लवकरात लवकर मार्गी लावावीत त्याचबरोबर मागील दोन ते तीन वर्षापासून रखडलेली चटोउपाध्याय व निवड श्रेणी प्रकरणे मार्गी लावावीत जि. प. शाळेतील स्वयंपाकी, मदतनीस यांचे मानधन वाढवून द्यावे.



निवेदनात, कला, क्रीडा कार्यानुभव या कर्मचाऱ्यांना ८.५.२४ च्या उच्च न्यायालयाच्या आदेशाचे अनुपालन करून कार्यमुक्त करण्यात येऊ नये, घड्याळी तासिका कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर २०२४ नुसार मानधन वाढ देण्यात यावी, टीईटी परीक्षा रद्द करावी, ५३ वर्षावरील कर्मचाऱ्यांना जनगणनेच्या कामातून कार्यमुक्त करावे आदी शिक्षकांच्या मागण्यावर योग्य चर्चा करण्यात आली. त्यावर शिक्षणाधिकारी खंदारे यांनी येणाऱ्या आठ दिवसांमध्ये यावर योग्य तो अभ्यास करून या सर्व समस्या मार्गी लावू, असे आश्वासन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना दिले.

विशेष म्हणजे, संघटनेच्या वतीने शिक्षणाधिकारी पदावर कायमस्वरूपी नवनियुक्ती झाल्याबद्दल खंदारे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जनता शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रा. लक्ष्मण आंधळे, भाजप शिक्षक आघाडीचे राज्य सदस्य अरुण पारधी, तत्कालीन शिक्षणाधिकारी विशाल डोंगरे, उपाध्यक्ष गोपीनाथ ठुले, उत्तम तांदळे, तालुकाध्यक्ष विलास शहारे, भारत सोनटक्के, सखाराम गोदे, बालाजी राठोड, प्रकाश भेलावे, मनोज हरिणखेडे, रवी तुरकर, सचिन पवार, भवरिया, पटले, वैभव पराते इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# शासनाच्या त्या निर्णयामुळे मासेमारी करणाऱ्यांवर बेरोजगारीची कुऱ्हाड

**सालेकसाः–** शासनाद्वारे वन हक्क समितीला परिपत्रक काढत धारणा हक्क प्रमाणे तलाव देण्यात आलेले आहेत. ज्याच्यामध्ये माजी मालगुजारी तलावच्या सुद्धा समावेश आहे. हे सर्व तलाव मत्स्यपालन करिता मत्स्य पालन सहकारी संस्था यांना करारनामा करून आजपर्यंत देण्यात येत होते. पण शासनाने वेगळाच काही मार्ग काढून शासनाने वन हक्क समिती यांना तात्काळ तलाव खाली करण्याचे निर्देश देत आहे. या निर्णयामुळे मासेमारी करणाऱ्या समाजावर उपासमारीची वेळ येणार आहे. तेव्हा यावर तोडगा काढण्यात यावा, अशा मागणीचे निवेदन जिल्हा मच्छीमार संघटना शाखा सालेकसाच्या वतीने खासदार प्रफुल पटेल यांना देण्यात आले.



मासेमारी करून कुटुंबाचा गाडा चालविणारे अनेक कुटुंब जिल्ह्यात आहेत. शासनाच्या अजब–गजब धोरणामुळे उपासमारीची वेळ येणार असून बेरोजगार वाढणार आहे.

दरम्यान शासनाच्या त्या निर्णयावर काही तोडगा काढण्यात यावी, या मागणीला घेवून अनेकदा जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना भेटून आणि पत्रव्यवहार करण्यात आले. मात्र काही हाती आले नाही. परिणामी तलावाचे करार केले असून ते खाली करणे शक्य नाही. दरम्यान २४ एप्रिल रोजी जिल्हा मच्छीमार संघटना व सालेकसा तालुका मत्स्य पालन सहकारी संस्थाच्या पदाधिकारी यांनी राज्यसभा खासदार प्रफुल पटेल, आमदार राजकुमार बडोले यांची भेट घेवून निवेदन सादर केले. यावर खा. पटेल यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी संवाद साधला आणि मत्स्य पालन सहकारी संस्था तसेच ढ्यावर व्यवसायावर अवलंबून असणारे समाजाचे कोणत्याही व्यक्तीवर अन्याय होणार नाही अशी हमी दिली.

यावेळी अध्यक्ष लक्ष्मीचंद मेश्राम, उपाध्यक्ष आनंद राव वलथरे, संचालक जयेंद्र कुमार मानकर, नीलाराम मेश्राम, संचालक शिवलाल उके, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष डॉ अजय उमाटे, शहर अध्यक्ष ब्रजभूषण बैस प्रामुख्याने उपस्थित होते.

# कोहमारा येथे बंदिस्त नको,खुला उड्डाणपूल उभारा

**कोहमारा :–** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील कोहमारा येथे प्रस्तावित गावाची विभागणी करणारा बंद उड्डाणपूल नको तर कालमवर आधारित खुला पूल तयार करा, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे. यासंबंधीचे निवेदन खा. प्रफुल्ल पटेल यांना शुक्रवारी (दि. २४) देण्यात आले.

सडक अर्जुनी तालुक्यातून जाणाऱ्या मुंबई कोलकत्ता राष्ट्रीय महामार्ग ५३ वरील कोहमारा हे स्थळ मध्य प्रदेश ते तेलंगणा राज्याला जोडणारा प्रमुख मार्ग आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत कोहमारा येथे उड्डाणपूल उभारण्याचे काम प्रस्तावित आहे. बंद पूल (आरईवल डिझाईन) मंजूर झाल्याची माहिती आहे. या कामाची निविदा प्रक्रिया होऊन दोन



ते तीन महिन्यांत या उड्डाणपुलाचे काम सुरू होणार आहे. मात्र, या बंद पुलामुळे गावाची सरळ सरळ दोन भागात विभागणी होणार असून, याचा फटका येथील व्यापारी वर्गाला तसेच सर्वसामान्य नागरिकांना बसणार आहे. त्यामुळे बंद उड्डाणपुलाला गावकऱ्यांनी विरोध दर्शवला असून, याठिकाणी खांबाचा खुला उड्डाणपूल तयार करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे. विशेष म्हणजे यापूर्वीही बंद पुलाला गावकऱ्यांनी विरोध केला होता. यावेळी हे काम थांबविण्यात आले होते. खा. प्रफुल्ल पटेल शुक्रवारी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता, त्यांना या मागणीचे निवेदन देण्यात आले.

शिष्टमंडळात जि.प. सदस्य मिलन राऊत, ब्रजेस दीक्षित, अजय अग्रवाल, जोगेंद्र साखरे, हिरालाल मेश्राम, मुकेश अग्रवाल, निखिल राऊत, अशोक खाडे, आनंद वालदे, अश्विन मेश्राम यांचा समावेश होता.


## ग्रामपंचायत कार्यालय येरंडी/देवल.

### पंचायत समिती अर्जुनी/मोर,जिल्हा परिषद गोंदिया

### निविदा सुचना

दि.२७/०४/२०२६

ग्रामपंचायत कार्यालय येरंडी/देवल, पंचायत समिती अर्जुनी/मोर, जिल्हा परिषद गोंदिया यांच्यावतीने खालील नमुद केलेल्या प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना अंतर्गत विवरणातील बांधकामाची ऑनलाईन जाहिरात पध्दतीने महाराष्ट्र शासन जि.प.गोंदिया सार्वजनिक बांधकाम विभागाच्या योग्य त्या वर्गातील पंजीबध्द असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावार पध्दतीने दोन लिफापा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे.या निवेदेबाबात संपुर्ण माहिती ग्रा.प.येरंडी/देवल येथे दि.२७/०४/२०२६ रोजी दु.३ वाजेपासून दि.०८/०५/२०२६ ला दुपारी ३ वाजेपर्यंत पाहता येईल.सदर निविदा दि.०८/०५/२०२६ ला दु.३ वाजता पर्यंतचे कालावधीत कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक किंमत | निविदा फार्म किंमत | अनामत रक्कम | काम करावयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | दिपक तागडे यांच्या घराजवळ सौर ऊर्जा पंप बसविणे | ४,९९,८६०/– | ५००/– | ५०००/– | ६ महिने |
| २ | मिलन बोरकर यांच्या घराजवळ सौर ऊर्जा पंप बसविणे | ४,९९,८६०/– | ५००/– | ५०००/– | ६ महिने |
| ३ | अंगणवाडी केंद्र क्रं.२ आवारभिंत बांधकाम करणे | ५,००,०००/– | ५००/– | ५०००/– | ६ महिने |
| ४ | जि.प.शाळा दुरुस्ती करणे | ४,५०,०००/– | ५००/– | ४५००/– | ६ महिने |
| ५ | ग्रामपंचायत कार्यालय व अंगणवाडी केंद्र क्रं.१ शौचालय व मुतारी बांधकाम करणे | ४,५०,०००/– | ५००/– | ४५००/– | ६ महिने |

१) वरील कामाची निविदा विक्री व स्विकृती फॉर्म दि.:–२७/०४/२०२६ ला ३.०० वाजेपासुन ते दिनांकः–०८/०५/२०२६ ला दु. ०३.०० वाजेपर्यंत
२) सदर कामाची निविदा उघडणे दिनांकः–११/०५/२०२६ दु.०३.०० वाजता(शक्य असल्यास)
३) निविदा धारकांनी निविदा फार्म खरेदी करतांना नमुना ७ च्या पावतीद्वारे निविदा फी भरण्यात यावी.
४) सुरक्षा अनामत ही निविदा भरतांना नमुना ७ च्या पावतीद्वारे ग्रा.प.येरंडी/देवल येथे जमाकरुन पावती.क्र.नोंदणी करुन पावतीची प्रत कार्यालयात जमा करावी
५)कोणतीही निविदा अशंतःअथवा पुर्णतःस्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी व ग्रा.पं.येरंडी/जेवल यांनी राखुन ठेवण्यात आलेलेल आहे.
.सदर कामाची तपशिलवार पुर्ण माहिती अटी शर्तीसह ग्रामपंचायत कार्यालय येरंडी/देवल च्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केले आहे.

**सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय येरंडी/देवल**

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत कार्यालय येरंडी/देवल**


# महिला आरक्षणावरून भाजपच्या उलट्या बोंबा

## महिला कॉंग्रेस कमिटीचे प्रत्युत्तर : देशाची दिशाभूल करत असल्याचा आरोप

**गोंदिया:–** महिलांना आरक्षण देण्यासंदर्भात सप्टेंबर २०२३ मध्ये राज्यसभा आणि लोकसभेत प्रस्ताव एकमताने पारीत झाला. राजकीय आरक्षणाचा पायंडाच काँग्रेसने घातला आहे. आधीच पारीत झालेल्या प्रस्तावाला कायद्याचे स्वरूप देण्यात आले नाही. उलट महिला आरक्षणाची आड घेवून सत्ताधारी भाजपने चुकीच्या परिसिमनाचा प्रस्ताव पारीत करण्याचा कुटील डाव रचला होता. तो डाव विरोधी पक्षाने हाणून पाडला. सत्ताधारींचा डाव उधळून लावल्यामुळे आता भाजप काँग्रेसवर खोटा आरोप करत असून हा चोरांच्या उलट्या बोंबा असाच प्रकार असल्याचा आरोप काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्ष वंदना काळे यांनी केला.



येथील शासकीय विश्रामगृहात त्या आज, २४ एप्रिल रोजी पत्रकारांशी बोलत होत्या. यावेळी काँग्रेस जिल्हाध्यक्ष दिलीप बनसोड, अमर वराडे, राजेश चांदेवार, राजू काळे, विमल कटरे आदी उपस्थित होते. वंदना काळे म्हणाल्या, तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी पंचायत राज व्यवस्थेत आरक्षण लागू केले. त्यामुळेच स्थानिक स्वराज्य संस्थांमुळे महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळाले. ते आरक्षण आता महाराष्ट्रात ५० टक्क्यांवर आहे. काँग्रेसने नेहमीच महिला नेतृत्वाला स्थान दिले.

देशाचे पंतप्रधान, राष्ट्रपती, मुख्यमंत्री आणि पक्षाचे अद्यक्षपद देखील महिलांना दिले. उलट भाजप दुटप्पी भूमिका खेळत असून त्यांनी आजपर्यंत महिलांना दुय्यम लेखले आहे. लोकसभा आणि राज्यसभेत २०२३ मध्येच महिला आरक्षण विधेयक पारीत झाले असताना त्याला लागू करण्यात आले नाही. उलट महिला आरक्षणाच्या आड चुकीचे परिसिमन करण्याचा डाव रचण्यात आला होता. त्या परिसिमनात ओबीसी, अनुसूचित जाती, जमाती यांच्यावर अन्याय होणार होता. त्यामुळे परिसिमन बिल नाकारल्यामुळे सत्ताधारी भाजपची नाचक्की झाली. त्यामुळे त्यांचे मनसुबे हाणून पडल्याने आता काँग्रेसवर खोटे आरोप करत आहेत.

भाजपमध्ये जराही महिलांप्रती निष्ठा असेल तर २०२३ मध्ये पारीत झालेले विधेयकाचे कायद्यात रुपांतर करावे, काँग्रेस त्याचे समर्थन करेल, असेही त्या यावेळी म्हणाल्या.

# ग्रामपंचायतींच्या शाश्वत विकासासाठी लोकसहभाग आवश्यक-जि.प.अध्यक्ष भेंडारकर

## पंचायतराज सरपंच मेळावा उत्साहात



**गोंदिया:-** ग्रामपंचायतींच्या शाश्वत विकासासाठी लोकसहभागाची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी केले.श्री भेंडारकर हे सडक अर्जुनी येथे आयोजित पंचायतराज सरपंच मेळाव्यात अध्यक्ष पदावरून बोलत होते.

मंचावर मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम एम., उपाध्यक्ष सुरेश हर्षे,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ तानाजी लोखंडे, जिल्हा परिषदेचे सभापती डॉ. लक्ष्मण भगत, श्रीमती रजनी कुंभरे, श्रीमती दीपा चंद्रिकापुरे, पंचायत समितीचे सभापती चेतन वडगाये, मुनेश रहांगडाले, तेजराम चव्हाण, आम्रपाली डोंगरवार, योगिता पून्डे, चित्रलेखा चौधरी, वीणा कटरे यांच्या सह जिल्हा परिषदेचे सर्व सदस्य, सरपंच गंगाधर परशरामकर,चंद्रशेखर बहेकार,तसेच ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष कमलेश बिसेन उपस्थित होते.

श्री भेंडारकर पुढे म्हणाले की, ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या स्थानिक त्रिस्तरीय समित्यांच्या समन्वय्याने गावाचा विकास होतो. यासाठी सरपंचांची भूमिका महत्वाची आहे असे सांगून भेंडारकर पुढे म्हणाले की, ग्रामपंचायतीला विविध कर आकारणीचा अधिकार आहे. ज्यामुळे गावातील रस्ते, पाणीपुरवठा,स्वच्छता, शाळा आणि इतर मूलभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध होतो हा निधी १००% प्राप्त करण्यासाठी गावकऱ्यांनी मोलाची भूमिका साकार करावी.तसेच गावाचा विकास साधण्यासाठी सीएसआर कडून प्रसंगी मदत मिळण्यासाठी प्रयत्न करा, ग्रामपंचायतीने मागणी केल्यास जिल्हा ग्राम विकास निधीतून कर्ज देण्यात येईल,असे ते म्हणाले.

याप्रसंगी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम म्हणाले की, ग्रामपंचायतींच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र यावे यासाठी हा मेळावा आहे. ग्रामपंचायतीनी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण )राबवून ६५ हजार कुटुंबांचे घरकुल तय्यार झाले असून गोंदिया जिल्हा महाराष्ट्रात प्रथम आला आहे.यावर त्यांनी ग्रामपंचायतिचे जोरदार कौतुक केले.गावात पिण्याच्या पाण्याची भेडसावणारी समस्या निर्माण होऊ नये, सर्वांना पिण्याचे पुरेषे पाणी मिळाले पाहिजे, यासाठी प्रयत्न करा.ते पुढे म्हणाले की, स्मशानभूमीच्या सौंदर्य करणासाठी प्रयत्न करण्यापेक्षा गावात वाचनालय निर्माण करुण अभ्यास करण्याची गरज आहे, असे सांगून त्यांनी भरणोली येथील एका वाचनालयाचे उदाहरण देऊन हे स्पष्ट केले.ते म्हणाले की, स्मशानभूमीच्या विकासापेक्षा,ग्राम पंचातिला मिळणारा निधी हा १०० टक्के रस्ते, स्वच्छता,नाली, शाळा आणि पाणी यावर खर्च झाला पाहिजे.

उपाध्यक्ष हर्षे म्हणाले की, सामान्य माणसाला न्याय देण्यासाठी ज़िल्हा परिषद तुमच्या पाठीशी आहे. त्यांनी सरपंचांना विकासाचे केंद्रबिंदू आहे असे सांगून सर्वांना सोबत घेऊन चाला या भावनेतून कार्य करुण गावाचा विकास करण्याचे आव्हान केले.डॉ लोखंडे यांनी सरपंचांनी कर्तव्यात कसूर करू नये यावर कायद्याची जाणीव करुण दिली.

यांप्रसंगी बोलताना नागपूर येथील खुरसापार ग्रामपंचायतचे माजी सरपंच सुधीर गोतमारे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात खेडेगाव स्वयंपूर्ण आणि मजबूत स्थितीत होते. परंतु आता विकासाची संकल्पना राजकीय पुढाऱ्यांनी निर्माण केली आहे. केवळ रस्ते, नाल्या हीच संकल्पना रूढ झाली आहे. ते पुढे म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जपान मधून पाच वर्ष कालावधीची संकल्पना स्वीकार करुण, ही पाच वर्षाची संधी सरपंचांना मिळाली आहे.या संधीचे सोने करा असे ते म्हणाले.

यावेळी भजियापार (ता. आम गाव ) खोडशीवणी (ता. सडक /अर्जुनी) आणि भजेपार (ता. सालेकसा) येथील सरपंचानी तसेच ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी विविध विषयांवार मार्गदर्शन केले.यांप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रमच्या माध्यमातून माझी वसूंधरा आणि शेतकरी राजा यावर विद्यार्थिनींनी नृत्य सादर केलं. दरम्यान मान्यवरांच्या हस्ते कर्तृत्ववान कर्मचाऱ्यांचा सन्मान करुण प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

महापुरुषांच्या छायाचित्रांना माल्यार्पण करुण, वंदेमातरम आणि महाराष्ट्र गीताने कार्यक्रमांची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत ) एम. एम. वासनिक यांनी तर संचालन संख्यिकी अधिकारी वैशाली खोब्रागडे आणि शिक्षक सत्यवान गजभिये यांनी केले तर आभार गटविकास अधिकारी आदित्य ठाकरे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशश्वितेसाठी सहाय्यक गट विकास अधिकारी एस. आय. वैद्य,सडक अर्जुनीचे दिलीप खोटेले,जयंत खोटेले, सी. आर. शहारे, वाय. सी. पटले,गुणवंत ठाकूर,ज्ञानेश्वर कानडे, श्यामराव समरीत, पृथ्वीराज कोल्हटकर, प्रकाश तिरेले, रोहित बनसोड, प्रकाश रहांगडाले, सुनील चव्हाण, दिलीप चौधरी,सुनील साखरे आणि सर्व कर्मचारी वृंद यांनी प्रयत्न केले.

# पणन महासंचालकाचा कृउबास व उपनिबंधकाला दणका




**गोंदिया:-** सन २०१६ मध्ये तत्कालीन प्रभारी सभापती धनलाल ठाकरे यांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्रीच्या अधिनियमाचे उल्लंघन करून कर्मचाऱ्यांची अस्थायी भरती केली. तसेच वेतनश्रेणी वाढ दिली. असा आरोप करीत कृषी उत्पन्न बाजार समिती गोंदिया, जिल्हा उपनिबंधक व सहायक निबंधक यांनी या प्रकरणात कृउबास संचालक तथा तत्कालीन सभापती ठाकरे यांना दोषी ठरवून कारवाई केली होती. तसेच ३ कोटीहून अधिकची रक्कम वसूली पात्र असल्याचे ठरविले होते, यावर पणन संचालकाने वसुलीचे आदेश रद्द केले आहे. कानवसुलाच तसेच कारवाई एकतर्फी करण्यात आल्याचा ठपका ठेवला आहे. या आदेशामुळे कृउसबास व जिल्हा उपनिबंधकाना धक्का लागला आहे.

सविस्तर असे की, कृउबास संचालक धनलाल ठाकरे हे सन २०१६ मध्ये प्रभारी सभापती होते. या काळात काही हंगामी कर्मचाऱ्यांना अस्थायी करण्यात आले. तसेच त्यांच्या त्यांना वेतनश्रेणी वाढ देण्यात आली. हे नियमबाह्य आहे, असा ठपका ठेवत चौकशी दरम्यान ठाकरेयांना कसलीही संधी न देता दोषी ठरविले होते. तसेच ३ कोटी ८२ लाख ६४ हजार १३५ रूपये वसुलीस पात्रही ठरविले. या विरोधात धनलाल ठाकरे यांनी पणन संचालनाय पुणे यांच्याकडे दाद मागितली. पणन महासंचालकाने वादी धनलाल ठाकरे व प्रतिवादी जिल्हा उपनिबंधक गोंदिया, कृषी उत्पन्न बाजार समिती गोंदिया व सहायक निबंधक हरीहर कुहीकर या तिघांचे म्हणणे ऐकून घेतले.

दरम्यान पणन सहाय्यक संचालकाला या प्रकरणात महत्वाच्या नृट्या दिसून आल्या. त्यातून केलेली कारवाई ही एकतर्फी असल्याचेही समजून आले. त्यामुळे सहाय्यक संचालकाने या प्रकरणात आदेश देत अर्जदार धनलाल ठाकरे यांचा विलंब माफीचा मान्य करण्यात आले.

प्रतिवादी यांनी एकाट्या ठाकरे यांनाच सर्व रकमेचे वसलीस पात्र ठरविणे चुकीचे आहे. त्यामुळे ते ३ फेब्रवारी २०२५ चे आदेश रद्द करण्यात आले. तसेच जिल्हा उपनिबंधक यांना सदरप्रकरणी महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री अधिनियमाचा अवलंब करून बाजार समितीची चौकशी करण्याची मुभा दिली आहे. हे आदेश सह संचालक राजेंद्र दराडे यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आले आहे.

या आदेशामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती गोंदिया व जिल्हा उपनिबंधकांना चांगलाच धक्का लागला आहे. उल्लेखनिय असे की, हे प्रकरण न्यायप्रविष्ट देखील आहे. त्यामुळे न्यायालयाच्या निर्णयाकडेही लक्ष लागले आहे.

# नागपूर जिल्हा बार असो.च्या उपाध्यक्षपदी एड.विकास कऱ्हाडे विजयी



**नागपूरः-** नागपूर जिल्हा बार असोसिएशन (DBA) च्या २०२६ सालासाठीच्या निवडणुकीकरीता असोसिएशनने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार २४ एप्रिल २०२६ रोजी मतदान पार पडले.

या निवडणुकीच्या निकालांची घोषणा आणि मतमोजणी २५ एप्रिल रोजी करण्यात आली. यात नागपूर जिल्हा वकील बार असोसिएशनच्या निवडणुकीत उपाध्यक्ष पदी ऍड विकास डी.कऱ्हाडे यांनी दणदणीत विजय मिळिवला.एड.कऱ्हाडे यांनी आपल्या यशामागे आपले सर्व मित्र, सहकारी, ज्येष्ठ वकील बंधू-भगिनी तसेच हितचिंतक यांचे मोलाचे सहकार्य आणि आशीर्वाद असल्याचा उल्लेख केला आहे.

## आरटीईची ६२ कोटी प्रतीपूर्ती रक्कम तत्काळ द्या

**गोरेगाव :-** जिल्ह्यातील कायम अनुदानित व स्वयं अर्थसंचालीत संस्था चालकांनी बालकांना मोफत व शक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियमाअंतर्गत दुर्बल घटक व वंचित गटातील बालकांना पहिल्या वर्गात २५ टक्के जागा दिल्या. या संस्थांचे २०१२-१३ ते २०२५-२६ पर्यंतची ६२ कोटी प्रतीपूर्ती रक्कम शासनाने तत्काळ द्यावी, अशी मागणी आरटीई फाउंडेशनने केली आहे.

शासनाने दुर्बल घटक व वंचित गटातील बालकांनी कॉन्व्हेंटमध्ये शिक्षण घ्यावे, याकरिता कायम अनुदानित व स्वयं अर्थसंचालीत शाळेत शिक्षण (आरटीई) सक्तीचे केल्याने २५ टक्के जागा घेतल्या जातात. या प्रतीपूर्तीची रक्कम शासनाने या संस्थांना दिली नाही. दरम्यान, या जिल्ह्यातील २७ शिक्षण संस्थांनी न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली. न्यायालयाने सहा संस्थांना प्रतीपूर्तीची रक्कम देण्याचे आदेश शिक्षण विभागाला दिले. या आदेशाला शिक्षण विभागाने धुडकाविले. त्यामुळे अवमानना याचिका पुन्हा सादर केल्यानंतर शिक्षण विभागाने सहा शिक्षण संस्थांना प्रतीपूर्तीची रक्कम दिली, तरीसुद्धा इतर शिक्षण संस्थांचे ६२ कोटी रुपये शासनाकडून अप्राप्त आहेत. महाराष्ट्र शासनाने ६० कोटी रुपये आरटीई प्रतीपूर्तीसाठी मंजूर केले आहेत. ही रक्कम मराष्ट्रातील इतर जिल्ह्यांतील शिक्षण संस्थांना दिली आहे. मात्र, गोंदिया जिल्ह्यातील शिक्षण संस्थांना यापासून वंचित ठेवले आहे.

# मका खरेदीस विलंब; शेतकऱ्यांचे प्रशासनाला निवेदन



**अर्जुनी-मोरगाव:-** तालुक्यातील शेतकऱ्यांनी मका खरेदी प्रक्रियेत होत असलेल्या विलंबाबाबत प्रशासनाकडे निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. २०२५-२६ हंगामातील मका खरेदी सुरू करण्याबाबत वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित यंत्रणेकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याची तक्रार निवेदनात करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांनी नमूद केले आहे की, बाराभाटी आदिवासी सेवा सहकारी संस्थेमार्फत मका खरेदी सुरू होण्याची अपेक्षा असताना प्रत्यक्षात खरेदी केंद्रावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. याबाबत आदिवासी विकास महामंडळ उप प्रादेशिक कार्यालय तसेच संबंधित विभागांकडे निवेदन देण्यात आले, मात्र अद्यापपर्यंत कोणतीही स्पष्ट सूचना किंवा निर्णय जाहीर झालेला नाही. ऑनलाइन नोंदणीची प्रक्रियाही सुरू न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

यंदा मका उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले असून, बाजारभावात सतत चढ-उतार होत असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. उत्पादन खर्च वाढलेला असताना योग्य दर न मिळाल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. अनेकांनी कर्ज घेऊन शेती केली असून, मका विक्री लांबल्याने त्यांच्यावर आर्थिक ताण वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी संबंधित संस्थेकडे तातडीने मका खरेदी सुरू करण्याची मागणी केली आहे. दोन दिवसांच्या आत खरेदी प्रक्रिया सुरू न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

दरम्यान, प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी किशोर बेलखोडे, शंकर धानगाये,किशोर येरणे व परिसरातील शेतकरीवर्गातून होत आहे.

## ९ मे रोजी राष्ट्रीय लोकअदालत आयोजन

**भंडारा:-** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई याच्या निर्देशान्वे जिल्हा वः सत्र न्यायालय, भंडारा तसेच साकोली, लाखनी, तुमसर, माहोडी, पवनी लाखांदूर येथील ताल्?का न्यायालयात शनिवार, ९ मे.२०२६ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय लोक अदालतमध्ये न्यायालयातील प्रलंबीत तडजोडीस पात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे, १३८ परिक्रम्य लेख अधिनियमाची प्रकरणी भूसंपादन प्रकरणे, कौटुंबिक प्रकरणे, मोटार वाहन अपघात दावा प्रकरणे, एम. एस. ई. बी. प्रकरणे, दरखास्त प्रकरणे, ग्राहक तक्रार न्याय निवारण प्रकरणे, न्यायालयातील प्रकरणे, न्यायालयातील बँकेशी संबधित प्रलंबित प्रकरणे तसेच वाद दाखल पूर्व प्रकरणांमध्ये टेलिफोन/मोबाईल कपनी संबंधित राष्ट्रीयकृत बँक, पतसंस्था, ग्रामपंचायत प्रकरणे दाखलपूर्व प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालत मध्ये ठेवण्यात आली आहे. राष्ट्रीय लोक आदालतीमध्ये न्यायालयातील तडजोडीस पात्र प्रलंबित प्रकरणे तसेच वाद दाखल पूर्व प्रकरणे दोन्ही पक्षकाराच्या सहमतीने आपसी तडजोडीने निकाली काढण्यास येणार आहे. पक्षकार, अधिवक्ता तसेच नागरिकांनी शनिवार दिनांक ९ मे रोजी आयोजीत राष्ट्रीय लोक अदालत समोर मोठ्या प्रमाणात प्रकरण ठेवून आपसी तडजोडीने निकाली काढावीत, असे आवाहन श्री. राजेश गोविंद अस्मर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, भंडारा यांनी केले आहे.

# मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाकडे दुर्लक्ष? फुलचूर व फुलचूर टोला प्रभाग रचनेवरून वाद



**गोंदिया :-** ग्रामपंचायत फुलचूर व फुलचूर टोला येथील प्रभाग रचनेच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा वाद निर्माण झाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशाचे पालन न करता प्रभाग रचना करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत माजी जि.प. सदस्य तथा भाजप नेते राजेश चतुर यांनी जिल्हाधिकारी मंगेश गोंदावले यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे.

ग्रामविकास विभागाने १७ फेब्रुवारी २०२६ रोजी काढलेल्या अधिसूचनेला आव्हान देत राजेश चतुर यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका क्रमांक २१३३/२०२६ दाखल केली होती. या याचिकेवर ११ मार्च २०२६ रोजी निर्णय देताना न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले होते की, भूमी अभिलेख अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २ मार्च १९७२, शासन राजपत्र २३ जून १९९४ तसेच जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ४(१) नुसार कार्यवाही करावी.तसेच संबंधित प्रक्रिया २८ दिवसांत पूर्ण होईपर्यंत दोन्ही ग्रामपंचायतींची प्रभाग रचना करू नये, असेही न्यायालयाने नमूद केले होते.

मात्र, न्यायालयाचा आदेश असतानाही महसूल अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांनी मनमानी पद्धतीने प्रभाग रचना करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत राजेश चतुर, शिवनारायण नागपुरे, मुकेश लिल्हारे आणि अशोक चने यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार सादर केली आहे.तक्रारीत २३ एप्रिल २०२६ पर्यंत न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्याचा दावा करण्यात आला असून, संबंधित अधिकाऱ्यांनी न्यायालयाचा अवमान केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.दरम्यान, जिल्हाधिकारी याबाबत काय निर्णय घेतात, याकडे दोन्ही गावांतील नागरिकांचे लक्ष लागले आहे. योग्य न्याय न मिळाल्यास भूमी अभिलेख अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याविरोधात न्यायालय अवमानाची कारवाई करण्याचा इशाराही राजेश चतुर यांनी दिला आहे.

# अन्यथा,घर आणि जनगणनेवरही बहिष्कार; सकल ओबीसी संघटनांचा इशारा

## रकान्यात ओबीसींचा उल्लेख नसल्याचे कारण




**गोंदिया:-** केंद्र शासनाच्या वतीने जनगणना सुरू करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात घरांची गणना करण्यात येत आहे. मात्र त्यात अनुसूचित जाती, जमाती यांचा उल्लेख आहे. परंतु, ओबीसींकरीता स्वतंत्र रकाना देण्यात आला नाही. केंद्र शासन वारंवार ओबीसींचा कळवळा आल्याचे दाखवते. परंतु, प्रत्यक्षात कृतीत मात्र ओबीसींवर अन्याय करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे घरांसह जनगणनेत जोपर्यंत ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना ठेवण्यात येत नाही, तोपर्यंत जनगणनेवर बहिष्कार घालण्याचा इशारा ओबीसी संघर्ष कृती समिती आणि सकल ओबीसी समितीने आज, २४ एप्रिल रोजी पत्रकार परिषदेत दिला.

केंद्र शासनाकडून जनगणनेला सुरूवात करण्यात आली आहे. त्याची सुरुवात १ एप्रिलपासून संपूर्ण देशात झाली. पहिल्या टप्प्यात घरांची जनगणना करण्यात येत आहे. घरांची माहिती ग्रामपंचायतींकडे आहे. असे असतानाही त्यांची देखील गणना होत आहे. त्यात अनुसूचित जाती, जमातींचा उल्लेख करण्यात आला आहे. परंतु, त्यात ओबीसींकरीता रकाना ठेवण्यात आलेला नाही. यापूर्वी २५ एप्रिल २०२५ रोजी केंद्र शासनाच्या कॅबिनेटमध्ये ओबीसींचा स्वतंत्र जनगणना करण्याचा ठराव करण्यात आला. केंद्रीयमंत्री श्री वैष्णव यांनी देखील तसे सूतोवाच केले. त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांनी या निर्णयाचे स्वागत करत होर्डिंग लावले. १६,१७ आणि १८ एप्रिल २०२६ रोजी तीन दिवसीय विशेष अधिवेशनात देखील जातनिहाय जनगणनेचे आश्वासन देण्यात आले. मात्र प्रत्यक्षात जनगणना करताना ओबीसी प्रवर्गाला त्यातून वगळण्यात आले.

सध्या घरांच्या गणनेतून ओबीसींना वगळून त्यांचा समावेश इतरमध्ये केला. त्यामुळे हे सरकार आगामी जनगणनेत देखील ओबीसींची स्वतंत्र गणना करणार नाही, असा समज झाला आहे. त्यामुळे हा ओबीसी प्रवर्गासोबत केलेला मोठा धोका आहे. असे झाल्यास ओबीसी समाज देशोधडीला लागेल. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांपासून प्रत्येक सरकारांनी या प्रवर्गाला धोका दिला. त्यामुळे जोपर्यंत घर किंवा जनगणना करताना ओबीसींकरीता स्वतंत्र रकाना ठेवण्यात येणार नाही, तोपर्यंत या जनगणनेवर ओबीसी समाज बहिष्कार टाकणार असल्याचा इशारा संघटनेचे अध्यक्ष बबलू कटरे यांनी दिला.

यावेळी अमर वराडे, मनोज मेंढे, सुनिल पटले,कैलाश भेलावे, राजेश चांदेवार, सुनील भोंगाडे, धनंजय वैद्य, वाय. टी. कटरे, कैलाश टेंभरे, माधवराव तरोणे, राजेश गिऱ्हेपुंजे, जितेंद्र कटरे, प्रदीप रोकडे, बी. एम. करमकर, आर. एम. कृपाण, आर. डी. कटरे, भूमेश ठाकरे, रवीकुमार पटले, दिगंबर पारधी, विजय लिल्हारे, योगेश फुंडे, जीवन शरणागत, मनोज शरणागत, भूमेश शेंडे, राजीव ठकरेले, विमल कटरे, छाया नागपुरे, निरज उपवंशी, नरेश परिहार यांच्यासह शेकडो ओबीसी बांधव उपस्थित होते.

### घरांच्या मोजणीत प्रवर्ग कशाला

**घरांच्या मोजणीत अनुसूचित जाती आणि जमातीचा उल्लेख करण्यात आला आहे. हे करून शासन काय सिद्ध करू इच्छित आहे. सरकारला जनगणनेत ओबीसींचाही रकाना ठेवायचा असेल तर मग घर गणतीतून ओबीसी प्रवर्गाला का वगळण्यात आले असा प्रश्न ओबीसी संघटनांकडून उपस्थित करण्यात आला. यापुढे जे ओबीसी पुढारी आपल्या प्रवर्गासाठी लढा देत नाहीत, त्यांना देखील समाज धडा शिकवणार असून त्यांच्याकडे कदापिही जावून आपल्या समस्या मांडणार नसल्याचा इशारा देण्यात आला.**

# आरक्षणाचे तुकडे करून जाती-जातींत भांडणे लावण्याचे षडयंत्र-आ.राजकुमार बडोले

***गोंदियात उपवर्गीकरण विरोधात गर्जना*बदर समितीचा अहवालाची जाहीर होळी*तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन**




**गोंदिया: -** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हजारो वर्षांच्या गुलामगिरीच्या बेड्या तोडल्या. बहुजन समाजाला एकत्र आणले. ते स्वप्न तोडण्याचा उपवर्गीकरणामार्फत सरकारी प्रयत्न आहे. समाजात फूट पाडणारा हा डाव हाणून पाडा असे आवाहन माजी सामाजिक न्यायमंत्री आ.राजकुमार बडोले यांनी केले. त्यांची शक्ती संपवण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न होत आहेत. ज्या समाजाला दोन हजार वर्षांपासून अस्पृश्यतेच्या नावाखाली गावाबाहेर ठेवले, अधिकारशून्य केले, त्या संपूर्ण वर्गाला बाबासाहेबांनी संविधानाच्या ३४१ व्या कलमानुसार एकसंघ मानून आरक्षणाचे कवच दिले होते. आता त्यात तुकडे पाडून सरकार भावा-भावांतफ भांडण लावत आहे, असा घणाघाती आरोप माजी मंत्री व आमदार राजकुमार बडोले यांनी केले.

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात २५ एप्रिल रोजी अनुसूचित जाती उपवर्गीकरण निर्णया विरोधात दुपारी ११ वाजेपासून सायंकाळी ४ वाजेपर्यंत विशाल धरणे आंदोलन व निदर्शनं करण्यात आली. ४४ अंश तापमानाची तमा न बाळगता हजारों महिला-पुरूष सहभागी झाले. वीस हजारावर लोकांच्या उपस्थितीने सर्वांचे लक्ष वेधले. आ. बडोले यांनी आंदोलनाच्या प्रारंभी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अन्य महापुरूषाच्या प्रतिमांना माल्यार्पण केले. तसेच डॉ.आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन केले. तसेच शहरातील मुख्य मार्गावरून विराट मोर्चा काढण्यात आला.

**बदर अहवालाची जाहीर होळी**

आंदोलकांच्यावतीने न्यायमूर्ती अनंत बदर समितीच्या अहवालाच्या प्रतींचे प्रतिकात्मक दहन करून सरकारचा तीव्र निषेध नोंदवण्यात आला. महाराष्ट्राच्या टोकावर असलेल्या या जिल्ह्यातील या विशाल आंदेलनाने राज्याचे लक्ष वेधून घेतले.

आपल्या तडाखेबंद भाषणात राजकुमार बडोले पुढे म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने २०२४ मध्ये उपवर्गीकरणाचा जो निर्णय दिला, तो संविधानाच्या मूळ ढाच्याला धक्का देणारा आहे. राज्य सरकारने घाईघाईने स्थापन केलेल्या बदर समितीत ५९ अनुसूचित जातींपैकी एकाही विद्वान लोकप्रतिनिधीला किंवा तज्ज्ञाला स्थान दिले नाही. १९३१ नंतर जातीय जनगणना झाली नसताना, सरकारकडे कोणता "ऑब्जेक्टिव्ह डेटा' उपलब्ध आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रात महार-बौद्ध ६१%, मातंग १८.७०%, चर्मकार १०.७%, खाटीक ०.८०%, सफाई कामगार १.७% अशी आकडेवारी असताना, उपवर्गीकरणामुळे छोट्या जातींना नेमके काय मिळणार? हा केवळ भ्रमिष्ट करण्याचा प्रकार आहे. सरकारने तात्काळ हा अहवाल सार्वजनिक करावा. संसदेत कायदा करून हा निर्णय रद्द करावा, अन्यथा हा वणवा गोंदियापासून संपूर्ण महाराष्ट्रात पेटल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

यांप्रसंगी आमदार विनोद अग्रवाल यांनी आंदोलनाला पाठिंबा देत सांगितले की, आरक्षण हा संवेदनशील विषय असताना नवीन मुद्द्यांमुळे समाजात संभ्रम निर्माण होत आहे. मूळ आरक्षणाला धक्का न लावता आधी जातीनिहाय जनगणना करणे गरजेचे आहे. जनतेच्या मागण्यांसाठी आम्ही रस्त्यावरची लढाई लढू आणि सरकारला हा निर्णय बदलण्यास भाग पाडू, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

या आंदोलनात प्रामुख्याने अमर वऱ्हाडे, नगरसेवक विजय रगडे, प्रकाश तांडेकर यशवंत गणवीर, सुनिल पटले, राजेश नंदागवळी, अविनाश काशीवर, कविता रंगारी, ज्येष्ठ पत्रकार भूपेंद्र गणवीर, कैलास भेलावे सचिन मून, अतुल गजभिये, घनश्याम पानतावणे, शालिनी डोंगरे, दीपा चंद्रिकापुरे, राजेंद्र बडोले, राजाभाऊ बनसोड, श्याम चौरे, प्रशांत शहारे, विश्वजीत डोंगरे, केवळ बघेले, गौतम साखरे, राकेश भास्कर, गौरव बिसेन, रणजित बारलिंगे, वर्षा सहारे, नितीन गडपायले, अजित मेश्राम, धनंजय वैद्य यांच्यासह विविध उपजातीचे प्रतिनिधी हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनाच्या शेवटी तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना विविध मागण्यांचे निवेदन सोपविण्यात आले.

